cmyk

दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१५३ | रविवार दि.२३ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### शेतीच्या उत्पादन वाढीसाठी डिजिटल ट्विन लर्निंग प्रकल्प

मुंबईः कृषी विभागाने राज्यातील शेतीचे उत्पादन वाढण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, उपग्रह तंत्रज्ञान, ड्रोन, आयओटी सेन्सर्स आणि डेटा ॲनालिटिक्सवर आधारित अभ्यास करावा. कापूस, सोयाबीन, तूर, ऊस, संत्रे, हळद, कांदा व मका या पिकांसाठी ‘शेती क्षेत्रात आर्टिफिशिएल इंटेलिजन्स व ‘डिजिटल ट्विन लर्निंग’ प्रकल्प महाराष्ट्रात प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यासाठी पहिल्या टप्प्यात दहा हजार शेतकऱ्यांची निवड करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे शेती क्षेत्रात आर्टिफिशिएल इंटेलिजन्स व डिजिटल ट्विन लर्निंग प्रकल्प सादरीकरणाबाबत आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीस कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, ऑनलाईन व्ही. सी. द्वारे कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर उपस्थित होते.

### दंगलग्रस्तांच्या पुनर्वसन जमिनीसाठी ९१ लाख मंजूर

मुंबईः १९८४ मधील दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादीत केलेल्या जमिनीच्या मोबदल्यापोटी ९१ लाख ६६ हजार २४६ रुपये इतकी रक्कम न्यायालयात जमा करण्यास मदत व पुनर्वसन विभागाने मंजुरी दिली आहे. २१ ऑगस्ट रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. गौरीपाडा (ता. भिवंडी ) येथील सर्व्हे क्र. २६ (३,७०० चौ.मी.) व सर्व्हे क्र. ६०/१ (१,६०० चौ.मी.) अशी एकूण ५,३०० चौ. मीटर जमीन १९८४ च्या दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादीत करण्यात आली होती. या जमिनीच्या मोबदल्यासाठी लक्ष्मण टावरे यांच्या वारसांनी भिवंडी दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला होता. भिवंडी दिवाणी न्यायालयाने दिलेल्या आदेशाविरोधात भिवंडी उपविभागीय अधिकाऱ्यांनी महायकोर्टात रिट याचिका दाखल केली. या याचिकेवर सुनावणी करताना हायकोर्टाने नगररचना मूल्य निर्धारण विभागाने ठरवल्याप्रमाणे व्याजासह ९१,६६,२४६ रुपये इतकी रक्कम तीन आठवड्यांच्या आत न्यायालयात जमा करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते.

### साखरेनंतर आता गुळानेही खाल्ला भाव

छ .संभाजीनगरः सध्या राज्यातील बाजारपेठेत साखरेच्या दरात मोठी वाढ झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अशातच आता साखरेनंतर गुळाच्या किमतीही वाढल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये गुळाच्या एक किलोला ८० ते ८५ रुपये मोजावे लागत आहेत. पंधरा दिवसांपूर्वी गुळाचे भाव ६० रुपये किलो होते. दहा किलोची भेली घ्यायची असेल तर ७० ते ७५ रुपये किलोने गूळ मिळतो आहे. साखरेच्या दरवाढीनंतर आता गुळाच्या किमतीमध्येही मोठी वाढ झाली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये किरकोळ बाजारात गुळासाठी आता ग्राहकांना किलोमागे ८० ते ८५ रुपये मोजावे लागत आहेत. विशेष म्हणजे अवघ्या पंधरा दिवसांपूर्वी हाच गूळ ६० रुपये किलो दराने मिळत होता. म्हणजेच पंधरा दिवसांत गुळाच्या दरात तब्बल २० ते २५ रुपयांची वाढ झाली आहे. दहा किलोची भेली घेतल्यास होलसेल बाजारात ग्राहकांना ७० ते ७५ रुपये किलो मोजावे लागत आहेत. अचानक गुळाच्या दरात एवढी वाढ का झाली? बाजारात गुळाचा पुरवठा कमी झाला आहे का? की उत्पादन आणि मागणीतील बदलाचा हा परिणाम आहे? ऐन सणासुदीच्या तोंडावरती दरवाढ झाल्याने सामान्य नागरिकांच्या खिशावर याचा परिणाम होणार आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

बीड, दि.२२ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०२.०० क्विंटल | २,४३४ | २,८३० | २,६१४ |
| ज्वारी/हायब्रिड: ११०.५० क्विंटल | २,१०० | ४,००० | २,९०९३ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : १०.०० क्विंटल | ६,४०१ | ७,३९९ | ६,९०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ४०.०० क्विंटल | २,२९२ | ३,८०० | २,७३१ |
| मुग: ८.५० क्विंटल | ८,७०० | ८,८०० | ८,७५० |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| हरभरा: १५.०० क्विंटल | ५,८३० | ५,८३० | ५,८३० |

# अल निनोचा कहर: दोन कृषी हंगामांना फटका

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**या वर्षीचा एल निनो गेल्या शंभर वर्षांतील सर्वात भीषण ठरण्याची शक्यता असून जागतिक हवामानात प्रचंड उलथापालथ होण्याचा इशारा ब्रिटनच्या हवामान विभागाने (मेट ऑफिस) दिला आहे. प्रशांत महासागराचे तापमान सरासरीपेक्षा तब्बल ३ अंश सेल्सिअसने वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या हवामान बदलामुळे संपूर्ण जगासह भारताच्या शेती क्षेत्राला मोठा फटका बसणार असून, देशातील खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामातील पिकांवर याचे गंभीर परिणाम होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.**

## १०० वर्षांतील सर्वात भयंकर इशारा! नव्या अहवालाने जग हादरले



ब्रिटनच्या मेट ऑफिसमधील हवामानशास्त्रज्ञ ॲडम स्केफ यांनी बीबीसीला दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत महासागरातील तापमानातील ही वाढ अभूतपूर्व आहे. हवामान नोंदींमधील माहितीनुसार, यंदाच्या नोव्हेंबरमध्ये तापमानातील वाढ ३.९ अंश सेल्सिअस वाढीसह सर्वोच्च पातळीवर पोहोचण्याची शक्यता आहे. जो २०१५ मधील सर्वात मोठ्या एल निनोच्या विक्रमालाही मागे टाकेल. एल निनोच्या प्रभावामुळे जागतिक तापमानाचा उद्रेक होणार असून, २०२४ पेक्षा २०२७ हे वर्ष इतिहासातील सर्वात उष्ण वर्ष ठरण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. ‘‘ही एक अभूतपूर्व घटना आहे, हे आपण स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे,‘‘ असे हवामानशास्त्रज्ञ स्केफ यांनी मेट ऑफिसच्या ब्लॉगमध्ये म्हटले आहे. त्यांनी पुढे सांगितले, ‘‘आमच्या अंदाजांमध्ये एल निनोचे इतके तीव्र संकेत यापूर्वी कधीही पाहिले नाहीत.‘‘ हवामान मॉडेलिंगमध्ये तज्ज्ञ असलेल्या स्केफ यांनी सांगितले की, जर हा अंदाज अचूक ठरला, तर २०२६ हे वर्ष एल निनो आणि त्याचे जागतिक हवामानावर होणारे परिणाम यांबाबतच्या आमच्या अलीकडील अनुभवांच्या पलीकडे जाणारे असेल. हे अल्पकालीन हवामानाचे अंदाज नाहीत. आपण येथे अत्यंत दीर्घकालीन आणि कायमस्वरूपी राहणाऱ्या परिस्थितीबद्दल बोलत आहोत,‘‘ असेही त्यांनी सांगितले. मेट ऑफिसने म्हटले आहे की, एल निनोच्या वाढत्या प्रभावामुळे भारतात

▶▶ पान २ वर

### कृषी क्षेत्राची चिंता वाढली

भारतीय हवामान विभागातील निरीक्षण आणि अंदाज गटाचे प्रमुख व शास्त्रज्ञ ओ. पी. श्रीजित यांनी सांगितले की, जागतिक स्तरावर २०२७ हे वर्ष २०२४ ला मागे टाकून सर्वात उष्ण वर्ष ठरण्याची मोठी शक्यता आहे. ‘‘भारतीय क्षेत्राचा विचार करता, येथील सरासरी तापमान २०२४ मधील विक्रमी तापमानापेक्षा जास्त न जाण्याची शक्यता आहे. हे सर्व २०२७ मधील मान्सून आणि त्यानंतरच्या एनसो स्थितीवर अवलंबून असेल,‘‘ असे ते म्हणाले. तरीही, पुढील वर्षी भारतात तीव्र उष्णतेच्या लाटा अनुभवण्यास मिळतील, असेही त्यांनी नमूद केले. याचा परिणाम चालू वर्षातील रब्बी पिकांपासून ते २०२७ पर्यंत जाणवू शकतो.

# महिला कधीच स्वतंत्र राहू नये हा मनुस्मृतीचा डाव!

## स्त्री ही देशाची सर्वात मोठी ताकद, पुण्यात राहुल गांधी कडाडले

पुणे । प्रतिनिधी

**महिला ही देशाची सर्वात मोठी ताकद असून, महिलांना कोणत्याही चौकटीत बंदिस्त ठेवता कामा नये, असे मत काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी व्यक्त केले. पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या ‘छात्रो की गुंज’ या कार्यक्रमात ते बोलत होते. ‘पिंजरा तोडा’ ही या कार्यक्रमाची संकल्पना होती.**

महिलांच्या स्वातंत्र्याच्या मुद्द्यावर भाष्य करताना राहुल गांधी म्हणाले की, महिला कधीच स्वतंत्र राहू नये, हा मनुस्मृतीचा डाव आहे. महिलांनी स्वतःच्या आयुष्याचे निर्णय स्वतः घेण्याचा अधिकार आहे. ‘तुम्ही स्वतःशिवाय कोणालाही बांधील नाही. महिलांवर कोणत्याही पुरुषाचा अधिकार नाही,’ असे त्यांनी स्पष्ट केले. महिलांनी आज देशातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे. शिक्षण, विज्ञान, उद्योग, प्रशासन, क्रीडा, राजकारण यांसह अनेक क्षेत्रांत महिला पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहेत. मात्र, एवढी प्रगती



होऊनही महिलांना आजही एका विशिष्ट चौकटीत बसवण्याचा प्रयत्न केला जात असल्याची खंत राहुल गांधी यांनी व्यक्त केली शिक्षणातील भेदभावावरही त्यांनी भाष्य केले. मुलींना शिक्षणाच्या समान संधी मिळत नाहीत. समाजातील रूढी, परंपरा आणि मानसिकतेमुळे अनेकदा मुलींवर मर्यादा घातल्या जातात. त्यामुळे

▶▶ पान २ वर

### तुम्हाला धमकावलं जाईल, घाबरवलं जाईल, पण...

काँग्रेस नेते तथा लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शनिवारी पुणे येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह काँग्रेसच्या राज्यातील प्रमुख नेत्यांची बैठक घेत राज्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. राहुल गांधींनी बैठकीत सुरुवातीलाच पुण्यात काल विद्यार्थ्यांची जी घटना घडली त्याची संपूर्ण माहिती घेतली, काँग्रेस नेत्यांकडून याबाबत त्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच, तुम्हाला अशा प्रकारे धमकावले जाईल... तुम्हाला घाबरवले जाईल... मात्र तुम्ही लढत रहा, असे म्हणत राहुल गांधींनी काँग्रेस नेत्यांना कानमंत्र दिला. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी राहुल गांधींसोबतच्या बैठकीचा वृत्तांत सांगितला.

# युक्तिवाद म्हणजे न्यायालयाचा निर्णय नव्हे

### शिवसेना पक्ष, चिन्ह वादावर राहुल नार्वेकरांची प्रतिक्रिया




कोल्हापूर । प्रतिनिधी

शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह वादावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरु आहे. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी ठाकरे गटाच्या वतीने निवडणूक आयोग तसेच महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी दिलेल्या निर्णयावर गंभीर आक्षेप घेण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर राहुल नार्वेकर यांनी प्रतिक्रिया दिली. युक्तिवाद म्हणजे न्यायालयाचा निर्णय नव्हे,


▶▶ पान २ वर

# आर्ट ऑफ लिव्हिंगच्या दंडाचे पाच कोटी परत करा–सर्वोच्च न्यायालय

दिल्ली । प्रतिनिधी

**श्री श्री रविशंकर यांच्या नेतृत्वाखालील ‘आर्ट ऑफ लिव्हिंग’ फाऊंडेशनला मोठा दिलासा देत, सर्वोच्च न्यायालयाने शनिवारी या आध्यात्मिक संस्थेने भरलेला ५ कोटी रुपयांचा दंड परत करण्याचे आदेश दिले. हा दंड २०१६ मधील एका वादग्रस्त कार्यक्रमाप्रकरणी भरण्यात आला होता, ज्या कार्यक्रमामुळे दिल्लीतील पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या यमुना नदीच्या पूरक्षेत्राचे नुकसान झाल्याचा आरोप होता.**

या सांस्कृतिक महोत्सवामुळे यमुना नदीच्या नाजूक परिसंस्थेचे नुकसान झाल्याचा कोणताही थेट पुरावा नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. ‘आर्ट ऑफ लिव्हिंग’च्या आश्रयाखाली असलेल्या ‘व्यक्ती विकास केंद्र’ या नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय संस्थेने भरलेला दंड दिल्ली विकास प्राधिकरणाने परत करावा, असे आदेश




न्यायालयाने दिले. हा दंड राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने लादला होता. मागील वर्षी मार्चमध्ये झालेल्या ‘जागतिक सांस्कृतिक महोत्सवा’च्या तयारी दरम्यान यमुना पूरक्षेत्राचे नुकसान केल्याबद्दल न्यायाधिकरणाने डिसेंबर २०१७ मध्ये ‘आर्ट ऑफ लिव्हिंग’ला जबाबदार धरले होते. आर्ट ऑफ लिव्हिंगला दिलासा देताना, सर्वोच्च न्यायालयाने असेही निरीक्षण

▶▶ पान २ वर

# ॲड.सदावर्ते भाषण ठोकून गेले अन मराठा ओबीसी सेवक कामाला लावले

## शिवाजीनगर पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी तक्रारी

बीड । प्रतिनिधी

ॲड.गुणरत्न सदावर्ते यांनी काल जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आक्रोश मोर्चामध्ये मनोज जरांगे खा. बजरंग सोनवणे यांच्यासह अनेकावर टीका केली होती या ठिकानंतर मराठा सेवकांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात जाऊन गुनरत्न सदावर्ते यांच्या विरोधात तक्रार केली तर जरांगे पाटील हे शासनामधील मंत्री व समाजाविषयी नेहमी अपशब्द वापरतात त्यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल करावा यासाठी ओबीसी सेवक उशिरापर्यंत पोलीस ठाण्यात ठाण माडून होते ॲड.सदावर्ते भाषण ठोकून गेले मात्र मराठा आणि ओबीसी सेवकांना कामाला लावून गेले अशी चर्चा सुरू झाली.

टाकळी तालुका केज येथील हॉटेल




व्यवसायिक विलास घुले या तरुणाची गट अर्जुन हत्या केल्याप्रकरणी खासदार पुत्राला अटक करण्यात यावी व आरोपीवर नको का नुसार कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर अक्रोश मोर्चा काढण्यात आला होता.

▶▶ पान २ वर

# सिंहस्थासाठी ३५ हजार कोटींची विकासकामे

## १२ कोटी भाविकांच्या स्वागताची तयारी, ८५ टक्के कामे कायमस्वरूपी

नाशिक । प्रतिनिधी

**नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू आहे. या कुंभमेळ्यात तब्बल १२ कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज असून, त्यांच्या सोयीसाठी सुमारे ३५ हजार कोटी रुपयांची विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. या कामांपैकी तब्बल ८५ टक्के कामे कायमस्वरूपी, तर केवळ १५ टक्के कामे कुंभमेळ्यापुरती तात्पुरत्या स्वरूपाची असणार आहेत. त्यामुळे कुंभमेळ्यासाठी**



**उभारण्यात येणा–या पायाभूत सुविधा पुढील अनेक वर्षे नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या विकासासाठी उपयुक्त ठरणार आहेत.**

कुंभमेळ्याच्या तयारीसाठी एकाचवेळी मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असल्याने नागरिकांना सध्या काही अडचणींचा सामना करावा लागत आहे. नाशिक–त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी एकाचवेळी हाती घेण्यात आलेल्या या विविध कामांमुळे खड्डेमय रस्ते, नाशिक व त्र्यंबकेश्वरमधील खोदकामे,त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालयाचे स्थलांतर आदी विविध कारणांवरून सामान्य नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी या कामांमुळे नागरिकांना सध्या त्रास सहन करावा लागत असल्याचे मान्य करीत ही कामे कुंभमेळ्यापुरतीच मर्यादित न राहता ती नाशिक जिल्ह्याच्या पुढील दीड ते दोन दशकांच्या विकासाचा पाया ठरणार असल्याचे नमूद केले. नाशिक–त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणामार्फत २२ हजार

▶▶ पान २ वर

### कुंभमेळ्यानंतरही सुविधांचा फायदाच होणार

धार्मिक परंपरा, आधुनिक तंत्रज्ञान आणि दीर्घकालीन पायाभूत सुविधांचा समन्वय साधून नाशिक–त्र्यंबकेश्वरला देशाची प्रमुख आध्यात्मिक राजधानी म्हणून विकसित करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे, असे कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. कुंभमेळ्यानंतरही या सुविधा नागरिक आणि पर्यटकांसाठी उपयोगी ठरतील, असा दावा कुंभमेळा प्राधिकरणाकडून करण्यात आला आहे.

# महाराष्ट्रातील चार शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार!

### बीड जिल्ह्यातील डॉ. कविता गिते यांनाही सन्मान

नवी दिल्ली । वृतसंस्था



विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देत शिक्षण क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या देशभरातील ४८ शिक्षकांची राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६ साठी निवड करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील चार शिक्षकांचा समावेश आहे. शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागामार्फत हा पुरस्कार दिला जातो. नावीन्यपूर्ण अध्यापन, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता व व्यक्तिमत्त्व विकास, शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केलेले प्रयत्न तसेच

▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# डेटा सेंटरच्या विकासाच्या आड महाराष्ट्राचा पर्यावरणीय श्वास कोंडू नये

महाराष्ट्राला औद्योगिक, तंत्रज्ञान आणि डिजिटल क्षेत्रात देशाचे नेतृत्व करायचे असेल, तर डेटा सेंटरसारख्या आधुनिक पायाभूत सुविधांचे महत्त्व नाकारता येणार नाही. डिजिटल अर्थव्यवस्थेचा विस्तार, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाऊड कम्प्युटिंग आणि ऑनलाइन सेवांसाठी डेटा सेंटर आवश्यक आहेत. मात्र, विकासाच्या या नव्या पर्वाकडे केवळ गुंतवणूक, रोजगार आणि अब्जावधी रुपयांचा व्यवसाय या चष्म्यातून पाहिले तर भविष्यात त्याची मोठी पर्यावरणीय किंमत महाराष्ट्राला मोजावी लागू शकते.

डेटा सेंटर म्हणजे फक्त संगणकांची मोठी इमारत नव्हे. ते चोवीस तास धावणारे प्रचंड ऊर्जा आणि पाणी वापरणारे औद्योगिक केंद्र असते. हजारो सर्व्हर सतत कार्यरत ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वीज लागते. त्याहून महत्त्वाचे म्हणजे या यंत्रणेतून निर्माण होणारी उष्णता कमी करण्यासाठी अत्याधुनिक कुलिंग यंत्रणा आवश्यक असतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा वापर होऊ शकतो. ज्या भागांमध्ये आधीच पाणीटंचाई, भूजलपातळीतील घट आणि शेतीसाठी पाण्याची कमतरता आहे, तिथे अशा प्रकल्पांच्या पाणीवापराचा गांभीर्याने विचार होणे अपरिहार्य आहे. प्रश्न केवळ पाण्याचा आणि विजेचा नाही. डेटा सेंटरच्या अखंड कार्यासाठी डिझेल जनरेटरसारख्या बॅकअप यंत्रणांचाही वापर होतो. प्रचंड क्षमतेच्या यंत्रसामग्रीचा सतत सुरू असलेला आवाज स्थानिक रहिवाशांच्या जीवनमानावर परिणाम करू शकतो. म्हणजेच, एका बाजूला डिजिटल जग वेगाने पुढे जात असताना दुसऱ्या बाजूला त्या विकासाची किंमत स्थानिक नागरिकांना आवाज, प्रदूषण, वाहतूक आणि संसाधनांवरील ताणाच्या रूपाने चुकवावी लागणार असेल, तर हा विकास नेमका कोणासाठी आहे, हा प्रश्न विचारावाच लागेल. सर्वात गंभीर प्रश्न आहे तो स्थानिक जीवनशैलीचा. गावांच्या आसपास मोठमोठे प्रकल्प उभे राहतात, तेव्हा त्या परिसराचे स्वरूप झपाट्याने बदलते. शेतीची जमीन, मोकळ्या जागा आणि नैसर्गिक अधिवास कमी होतात. गावांचे शहरीकरण होते; पण त्याबरोबर स्थानिकांच्या आयुष्यातील शांतता आणि सामाजिक रचना कुठेतरी हरवते. विकासाच्या नावाखाली एखाद्या गावाची ओळखच पुसली जात असेल, तर त्याला सर्वसमावेशक विकास म्हणायचे तरी कसे.? महाराष्ट्र सरकारने डेटा सेंटरच्या गुंतवणुकीचे स्वागत जरूर करावे; पण त्यासाठी पर्यावरणीय नियम शिथिल करण्याची किंवा स्थानिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याची गरज नाही. प्रत्येक मोठ्या डेटा सेंटरसाठी पाणी वापराचे स्वतंत्र ऑडिट, ऊर्जा वापराचे पारदर्शक विवरण, पुनर्वापरित पाण्याचा अनिवार्य वापर, अक्षय ऊर्जेचे प्रमाण, ध्वनी प्रदूषणाची मर्यादा आणि स्थानिक पायाभूत सुविधांवरील परिणामाचे मूल्यमापन बंधनकारक केले पाहिजे. डेटा सेंटर उभे राहिले म्हणून विकास झाला, अशी सरकारी आकडेवारीची भाषा पुरेशी नाही. त्या प्रकल्पामुळे स्थानिक नागरिकांना किती रोजगार मिळाला, किती पाणी वापरले गेले, किती वीज लागली, किती प्रदूषण झाले आणि परिसरातील नागरिकांच्या जीवनमानावर काय परिणाम झाला, याचीही सार्वजनिक माहिती उपलब्ध झाली पाहिजे. महाराष्ट्राने डिजिटल भविष्यासाठी दारे उघडावीत; पण त्या दारातून पर्यावरणीय संकट आत येणार नाही, याची खबरदारीही घ्यावी. सर्व्हर थंड ठेवण्यासाठी जर गावकऱ्यांचे पाणी गरम होत असेल, तर तो विकास नव्हे; तो संसाधनांचा अन्यायकारक हस्तांतरण आहे. तंत्रज्ञानाच्या वेगाला विरोध करण्याची गरज नाही, गरज आहे ती विकासाच्या मॉडेलला प्रश्न विचारण्याची. महाराष्ट्राला डेटा सेंटर हवे आहेत; पण त्यासाठी महाराष्ट्राचे पाणी, हवा, जमीन आणि स्थानिकांचे जगणे पणाला लावून नव्हे. विकास आणि पर्यावरण यांच्यात निवड करण्याची वेळ येऊ नये, अशी शाश्वत धोरणरचना करणे हीच आजच्या सरकारची खरी कसोटी आहे.

# दुष्काळजन्य परिस्थिती सरसकट पंचनामे करा-डॉ.योगेश क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**बीड विधानसभा मतदारसंघातील बीड व शिरूर कासार तालुक्यात पावसाने प्रदीर्घ खंड दिल्याने खरीप पिके करपण्याच्या मार्गावर आहेत. पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, प्रशासनाने या भागातील नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने संयुक्त पंचनामे करावेत आणि शेतकऱ्यांना शासकीय आर्थिक मदतीसह पीकविम्याचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी बीड विधानसभा मतदारसंघाचे भाजप नेते डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**



यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे की, बीड व शिरूर कासार तालुक्यात शेतकऱ्यांनी यंदाच्या खरीप हंगामात कापूस, सोयाबीन, मूग, उडीद व तूर या पिकांची मोठ्या प्रमाणावर पेरणी केली होती. प्रारंभीच्या काळात समाधानकारक पाऊस झाल्यामुळे पिकांची वाढ चांगली झाली होती. मात्र, ऐन सोयाबीन शेंगा भरण्याच्या आणि कापूस पाते-बोंड धरण्याच्या अत्यंत संवेदनशील टप्प्यावर पावसाने दीर्घकाळ दडी मारली. यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची भीती निर्माण झाली असून अनेक भागांत उभी पिके करपून गेली आहेत. पावसाअभावी परिसरातील नदी-नाले, विहिरी आणि साठवण तलावांमधील पाणीपातळी खालावल्याने सिंचनाचा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. पर्यायी पाणी उपलब्ध नसल्यामुळे शेतीबरोबरच पशुधनासाठी चारा आणि पिण्याच्या पाण्याची भीषण समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. बियाणे, खते, औषधे व मशागतीसाठी कर्ज काढून केलेला खर्चही आता वाया जाण्याच्या भीतीने बळीराजा हवालदिल झाला आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन महसूल, कृषी व संबंधित यंत्रणांमार्फत दोन्ही तालुक्यातील गावनिहाय पिकांचे तातडीने प्रत्यक्ष पंचनामे करण्याचे आदेश प्रशासनाला द्यावेत, तसेच बाधित शेतकऱ्यांना निकषानुसार तत्काळ आर्थिक सहाय्य, पीकविम्याची भरपाई आणि शासकीय सवलती लागू कराव्यात, अशी मागणी बीड विधानसभा मतदारसंघाचे भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे.

# पोलीस प्रशिक्षण केंद्रात जलसंधारण कार्याला प्रारंभ

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते शुभारंभ; २५ जलशोषक खड्डे व ५० ट्रेन्च-कम-बंड्सची निर्मिती

**जालना । प्रतिनिधी**

**पावसाचा प्रत्येक थेंब अडवून तो जमिनीत मुरविण्याच्या उद्देशाने पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे जलसंधारणाच्या कामाला जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला.**



जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनातून जिल्हाभरात जलसंधारणाच्या कामांना मोठ्या प्रमाणावर चालना मिळत आहे. त्याला प्रतिसाद देत प्राचार्य अशोक बनकर यांच्या नेतृत्वाखाली आणि भूजल तज्ज्ञ डॉ. पंडित वासरे यांच्या मार्गदर्शनातून हे काम हाती घेण्यात आले आहे. पोलीस प्रशिक्षणार्थींच्या श्रमदानासह कुंडलिका-सीना फाऊंडेशनच्या संयुक्त सहभागातून प्रशिक्षण केंद्र परिसरात पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी जलसंधारणाच्या विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांवर ट्रेन्च-कम-बंड्स, तसेच पाण्याच्या प्रवाह क्षेत्रात मोठे जलशोषक खड्डे तयार करण्यात येत आहेत. कामाच्या शुभारंभाच्या वेळी १० जलशोषक खड्डे आणि २० ट्रेन्च-कम-बंड्स तयार करण्यात आले. संपूर्ण प्रशिक्षण केंद्र परिसरात एकूण २५ जलशोषक खड्डे आणि ५० ट्रेन्च-कम-बंड्स तयार करण्यात येणार आहेत. या जलसंधारण उपाययोजनांमुळे पावसाचे वाहून जाणारे लाखो लिटर पाणी परिसरातच अडवून जमिनीत मुरविणे शक्य होणार आहे. परिणामी भूजल पुनर्भरणास चालना मिळून परिसरातील भूजल पातळी उंचावण्यास मदत होणार आहे. समस्त महाजन संस्थेच्या विश्वस्त नूतन देसाई यांच्या माध्यमातून पोलीस प्रशिक्षण केंद्र परिसरात यापूर्वीही पाणलोट विकासाची विविध कामे करण्यात आली आहेत. यामध्ये पाझर तलाव, विहिरी तसेच कम्पार्टमेंट बंडिंगच्या कामांचा समावेश आहे. या कामांमुळे परिसरातील नागरी वसाहतींनाही त्याचे सकारात्मक परिणाम मिळत आहेत. यावेळी पोलीस प्रशिक्षण केंद्राचे केशव गिरडकर, कुंडलिकाचे उदय शिंदे, डॉ. विठ्ठल राजकर, अरविंद नाईकनवरे तसेच पोलीस प्रशिक्षण केंद्रातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ''पावसाचा प्रत्येक थेंब वाहून न जाता जमिनीत मुरला पाहिजे,'' या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमामुळे पोलीस प्रशिक्षण केंद्र परिसरात जलसंधारणाची भक्कम पायाभरणी होणार असून, भविष्यात भूजल पातळी वाढविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# कवडगाव ते श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी पायी दिंडी सोहळा

## सद्गुरु किसन बाबा महाराज यांच्या २८व्या पुण्यस्मरणानिमित्त तीन दिवसीय दिंडी सोहळ्याचे आयोजन

**कवडगाव । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा हा संत-महंतांची भूमी म्हणून ओळखला जातो. संतश्रेष्ठ माऊली दादा चाकरवाडीकर, वैकुंठवासी वामनभाऊ, भगवानबाबा, संत बंकटस्वामी महाराज तसेच श्रीगुरु संजीवन समाधीस्थ मनमतस्वामी महाराज यांसारख्या संतांच्या पावन कार्यामुळे बीड जिल्ह्याला मोठी आध्यात्मिक परंपरा लाभली आहे. जिल्ह्यातील विविध मंदिरांमध्ये वर्षभर धार्मिक कार्यक्रम, उत्सव, भजन-कीर्तन आणि दिंडी सोहळ्यांची रेलचेल पाहायला मिळते.**

याच धार्मिक परंपरेचा भाग म्हणून ह.भ.प. सद्गुरु वैकुंठवासी किसन बाबा महाराज, श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या २८व्या पुण्यस्मरणानिमित्त कवडगाव ते श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी असा तीन दिवसीय पायी दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी बुधवारी सकाळी ग्रामप्रदक्षिणा करून कवडगाव येथून दिंडीचे प्रस्थान होणार आहे. हरिनामाचा गजर आणि भगवंताच्या नामस्मरणात दिंडी मार्गक्रमण करीत ताडसोंना येथे पहिला मुक्काम करणार आहे. मुक्कामाच्या ठिकाणी रात्री हरी जागर भजन व पंथाचे नामस्मरण करण्यात येणार आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्ता व चहा-पाण्यानंतर दिंडी घाटसावळी मार्गे श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीकडे प्रस्थान करणार असून, दुसऱ्या दिवसाचा मुक्काम श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होणार आहे. दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ग्रामप्रदक्षिणा तसेच वैकुंठवासी सद्गुरु किसन बाबा महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात काल्याचे किर्तन श्रवण करून या दिंडी सोहळ्याची सांगता होणार आहे. कवडगाव ते गोरक्षनाथ टेकडी या सोहळ्याचे हे सलग १५वे वर्ष असून, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मोठ्या भक्तिभावाने दिंडी सोहळा पार पडणार आहे. हरिनामाचा गजर, भजन-कीर्तन आणि संतस्मरणाच्या माध्यमातून भाविकांना आध्यात्मिक आनंदाचा अनुभव घेता येणार आहे. या पवित्र दिंडी सोहळ्यात जास्तीत जास्त भाविक भक्तांनी सहभागी होऊन पायी वारीचा आणि हरिनामाचा आनंद घ्यावा, असे आवाहन समस्त भक्तगण, कवडगाव, येथील भजनी मंडळ तसेच समस्त गावकरी मंडळींच्या वतीने करण्यात आले आहे.

# जि.प.व पं.स. निवडणुकीत कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे-खा.डॉ.कल्याण काळे

**मंठा । प्रतिनिधी**

**मंठा तालुक्यात आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी काँग्रेसची जोरदार मोर्चेबांधणी सुरू असून निवडणुकीच्या अनुषंगाने कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे असे आवाहन खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केले.**



मंठा तालुका काँग्रेस कमिटीची आढावा बैठक काँग्रेस कमिटी संपर्क कार्यालयात खासदार डॉ. काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या बैठकीत काँग्रेसची संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांची तयारी, गावागावातील पक्षाचा संपर्क आणि आगामी निवडणुकीची रणनीती यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीला जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ कल्याण काळे, जिल्हाध्यक्ष कल्याण दळे तसेच माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंठा तालुका काँग्रेस कमिटीचे नवनियुक्त अध्यक्ष विवेक घारे होते. यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी तालुकाध्यक्ष विवेक घारे यांच्या कार्याचे कौतुक केले. मंठा तालुक्यात काँग्रेसची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी जुन्या-नव्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याचे आवाहन डॉ. काळे यांनी केले. तालुकाध्यक्ष विवेक घारे यांनी या बैठकीत आगामी निवडणुकांसाठी आक्रमक भूमिका मांडली. ''आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत काँग्रेसला विजयी करण्यासाठी गावागावात संघटन मजबूत करण्यात येईल. आगामी निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे,'' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या बैठकीस गणेशराव बोराडे, जालना जिल्हा सचिव निळकंठ वायाळ, शरद बोराडे, राजेश खंदारे, प्रकाश घुले, सुरेश वाव्हळे, आसाराम चोरमारे, गौतम सदावर्ते, आबासाहेब पुणेकर, रामप्रसाद जाधव, भगवानराव चव्हाळ, गणेशराव घारे, अविनाश चव्हाण, उद्धव पवार, बालासाहेब मोरे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अ‍ॅड.गणेशराव राठोड यांचे निधन

**मंठा । प्रतिनिधी**

**तालुक्यातील उमरखेडा येथील ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. गणेशराव हरीनाईक राठोड (वय ७७) यांचे २१ ऑगस्ट रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे ते सचिव होते.**



त्यांच्यावर उमरखेडा या मूळगावी शनिवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी खा.डॉ.कल्याण काळे, जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष कल्याण दळे, जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष राजेभाऊ देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित होती. स्व.गणेशराव राठोड यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, सुना, नातवंडे, चार भाऊ असा मोठा परिवार आहे. मा.आमदार धोंडीराम राठोड यांचे ते धाकटे बंधू, तर मा.आमदार राजेश राठोड यांचे ते चुलते होत.

पान १ वरून...

### अल निनोचा कहरः दोन

आधीच सरासरीपेक्षा खूप कमी पाऊस पडत आहे. भारतीय हवामान विभागाने यंदाच्या हंगामातील पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या केवळ ९० टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला आहे, जो गेल्या ११ वर्षांतील सर्वात कमी आहे. पावसाने मारलेल्या ओढीमुळे सध्याच्या खरीप हंगामातील पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. मेट ऑफिसचे आणखी एक शास्त्रज्ञ निक डन्स्टोन यांनी सांगितले की, ''२०२७ हे वर्ष आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष म्हणून २०२४ ची जागा घेण्याची दाट शक्यता आहे.'' २०२४ मध्ये जागतिक तापमान हे औद्योगिक क्रांतीपूर्व पातळीच्या तुलनेत १.५ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक वाढले होते जी आंतरराष्ट्रीय हवामान करारांतर्गत निश्चित केलेली मर्यादा आहे.

-------------

### युक्तिवाद म्हणजे न्यायालयाचा

असे त्यांनी म्हटले आहे. विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर कोल्हापूर दौऱ्यावर होते. त्यांनी श्री महालक्ष्मी (अंबाबाई) देवीचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, आपल्या संविधानिक प्रक्रियेत एखाद्या निर्णयाच्या विरुद्ध जर का आपले मत मांडायचे असेल तर न्यायव्यवस्थेकडे दखल घेण्याची विनंती करु शकतो. जे लोक माझ्या निर्णयाशी किंवा निवडणूक आयोगाच्या निर्णयाशी सहमत नसतील. याबाबत त्यांनी याचिका दाखल केली असेल तर त्यासंदर्भात युक्तिवाद करणे त्यांचा अधिकार आहे. युक्तिवाद झाला म्हणजे न्यायालयाचा निर्णय झाला असे नव्हे. त्यांनी त्यांचा युक्तिवाद केलेला आहे. दुसऱ्या बाजूने युक्तिवाद होईल. सगळ्या परिस्थितीची आणि वस्तुस्थितीची दखल घेता सर्वोच्च न्यायालय योग्य तो निर्णय घेईल, अशी अपेक्षा नार्वेकर यांनी व्यक्त केली. मी जो निर्णय दिला आहे तो माझ्या मते शाश्वत आणि कायद्याच्या चौकटीत राहून सर्वोच्च न्यायालयाच्या निकषाच्या अनुषंगाने दिलेला आहे. जोपर्यंत सर्वोच्च न्यायालय यावर अंतिम निर्णय देत नाही; तोपर्यंत मी यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही. पण अपात्रता प्रकरणी दोन्ही बाजू मांडल्यानंतर, मला खात्री आहे की यावर येत्या काळात योग्यरित्या निर्णय होईल, असेही त्यांनी सांगितले.

-------------

### महिला कधीच स्वतंत्र राहू नये

मुलींना शिक्षण, रोजगार आणि स्वतःच्या भविष्याबाबत निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. राहुल गांधी यांनी तरुणांच्या भूमिकेवरही विशेष भर दिला. भारताची तरुण लोकसंख्या ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे, असे ते म्हणाले. देशाच्या भवितव्यामध्ये तरुणांचा सहभाग महत्त्वाचा असून, त्यांना योग्य शिक्षण, संधी आणि स्वतःचे विचार मांडण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, 'मी येथे राजकारणावर बोलण्यासाठी आलेलो नाही,' असेही राहुल गांधी यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्पष्ट केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, त्यांच्या प्रश्नांवर चर्चा करणे आणि तरुणांच्या विचारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. 'पिंजरा तोडा' या संकल्पनेतून समाजातील महिला आणि तरुणांवर असलेल्या विविध सामाजिक बंधनांवर प्रश्न उपस्थित करण्यात आले. स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी आणि आपल्या क्षमतेनुसार पुढे जाण्यासाठी महिलांना तसेच तरुणांना मोकळे वातावरण मिळणे आवश्यक असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

----------

### अ‍ॅड.सदावर्ते भाषण ठोकून गेले अन

या मोर्चामध्ये गुणरत्न सदावर्ते यांनी मनोज जरांगे यांच्यावर यांच्यावर एकेरी भाषेत आरोप केले मन्या मन्या असे संबोधले गेले यासोबतच बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांना देखील यामध्ये आरोपी करण्यात यावे अशी मागणी गुणरत्न सदावर्ते यांनी केली प्रामुख्याने विलास घुले हत्या प्रकरणातील आरोपींना अटक करावी त्यांच्यावर मोकोकानुसार कारवाई करावी या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता मोर्चामध्ये द्वेषाने जरांगे यांच्यावर झालेल्या आरोप जिव्हारी लागल्याने मराठा सेवकांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यामध्ये जाऊन पुनरत्न सदावरती विरुद्ध परिसर तक्रार केली ही घटना कळाल्यानंतर ओबीसी सेवकांनी देखील शिवाजीनगर पोलीस ठाणे मध्ये रात्री उशिरा मोठ्या प्रमाणात गर्दी केली त्यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यामध्ये मनोज जरांगे पाटील हे नेहमीच जातीवर बोलतात मुख्यमंत्री मंत्री यांच्यावरही न शोधणारे आरोप याशिवाय त्यांच्या कुटुंबापर्यंत घाणेरडी भाषा बोलली जाते तेव्हा त्यांच्यावरही गुन्हा दाखल करावा अशी मागणी ओबीसी सेवकांनी निवेदनाद्वारे केली आहे एकीकडे काल पुनरत्न सदावरती भाषण ठोकून गेले मात्र इकडे मराठा आणि ओबीसी सेवकांना कामाला लावून गेल्याचे दिसून आले

-------------

### आर्ट ऑफ लिव्हिंगच्या दंडाचे पाच

नोंदवले की, यमुना नदीच्या पूरक्षेत्राचे संरक्षण करण्याच्या आपल्या कर्तव्यात डीडीए (दिल्ली विकास प्राधिकरण) अपयशी ठरले आहे. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (एनजीटी) दिलेल्या निर्देशानुसार, यमुना पूरक्षेत्राच्या पुनर्वसनाचे काम सुरू ठेवण्याचे निर्देशही न्यायालयाने नगर नियोजन आणि विकास संस्थेला दिले. संपूर्ण दंड भरण्यास सहमती दर्शवल्यानंतर, पर्यावरण समितीने आर्ट ऑफ लिव्हिंगला यमुना नदीच्या काठावर आपला भव्य कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी दिली होती, जो अखेरीस ११-१३ मार्च २०१६ रोजी पार पडला. ११ मार्च २०१६ रोजी, 'जागतिक सांस्कृतिक महोत्सवा'च्या उद्घाटन दिवशी, आयोजकांनी संपूर्ण रक्कम जमा करण्यासाठी चार आठवड्यांचा वेळ मिळावा यासाठी एनजीटीकडे याचिका दाखल केली होती. हरित न्यायाधिकरणाने त्या दिवशी संस्थेला २५ लाख रुपये जमा करण्याची परवानगी दिली होती आणि उर्वरित रक्कम भरण्यासाठी तीन आठवड्यांचा कालावधी दिला होता. त्यावेळी २५ लाख रुपये भरण्यात आले असले तरी, आर्ट ऑफ लिव्हिंगने नंतर अशी मागणी केली की, त्यांच्यावर थकीत असलेले ४.७५ कोटी रुपये ''उर्वरित रक्कम भरण्याऐवजी'' बँक गॅरंटी म्हणून गणले जावेत आणि त्या पैशांचा उपयोग त्या परिसरात जैवविविधता उद्यान स्थापन करण्यासाठी केला जावा. अखेरीस दंडाची संपूर्ण रक्कम भरण्यात आली असली तरी, आर्ट ऑफ लिव्हिंगने नंतर एनजीटीच्या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आणि एका प्रदीर्घ कायदेशीर लढाईचा मार्ग मोकळा केला.

-----------

### सिंहस्थासाठी ३५ हजार

४२५ कोटी ३९ लाख रुपयांची कामे केली जात आहेत. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग, त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्र विकास, महापारेषण आणि जिल्हा परिषद यांच्या विविध प्रकल्पांचा समावेश आहे. याशिवाय केंद्र सरकारच्या माध्यमातूनही ८ हजार ७६१ कोटी ५४ लाख रुपयांची कामे केली जात आहेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, राष्ट्रीय महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभाग, रेल्वे, महापालिका आणि एमएसआयडीसीच्या माध्यमातून रस्ते, वाहतूक, रेल्वे, पाणी, आरोग्य आणि इतर पायाभूत सुविधांशी संबंधित प्रकल्प राबवले जात आहेत.

-------------

### महाराष्ट्रातील चार शिक्षकांना

सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. केज येथील साने गुरुजी निवासी विद्यालयात कार्यरत असलेल्या डॉ. कविता गिते यांनी दिव्यांग तसेच ऊसतोड कामगारांच्या मुलांसह वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अध्यापन करताना त्यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गळती रोखण्यासाठीही प्रभावी प्रयत्न केले. याशिवाय नाशिक महानगरपालिका शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी कुंदा बच्छाव यांनी विविध अभिनव उपक्रम राबविले. 'मिशन मोबाईल-फ्री' अंतर्गत 'ज्ञानभिंती', 'आनंदवली शिक्षण कट्टा' तसेच अमेरिकेतील शाळांशी 'ई-ट्विनिंग'द्वारे संवाद अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांना डिजिटल आणि आंतरराष्ट्रीय शिक्षणाचा अनुभव मिळवून दिला. पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय, लातूर येथे कार्यरत असलेल्या वैभव कुलकर्णी यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा, विज्ञान-तंत्रज्ञान आणि कौशल्याधारित शिक्षणावर विशेष भर दिला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी विविध शालेय व राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सैनिक स्कूल, सातारा येथे कार्यरत असलेल्या शिवप्रसाद टिंगरे यांनी विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण आणि देशसेवेची भावना रुजविण्यासाठी विशेष योगदान दिले. एनडीए तसेच विविध स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून भावी लष्करी अधिकारी घडविण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे.

# महाराष्ट्रासह ६ राज्यांमध्ये १८०० किमी एलपीजी पाईपलाईन!

## केंद्र सरकारचा मोठा निर्णय



**दिल्ली । वृत्तसंस्था**

**देशातील एलपीजी पुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी तेल क्षेत्र नियामकाने सुमारे ७ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून १,८०० किलोमीटर लांबीच्या नवीन एलपीजी पाइपलाइन प्रकल्पांना मंजुरी दिली आहे.**

या प्रकल्पांमुळे देशातील अधिकृत एलपीजी पाइपलाइन नेटवर्क जवळपास २५ टक्क्यांनी वाढणार असून, एलपीजी वाहतुकीसाठी रस्ते मार्गावरील अवलंबित्व कमी होण्याची अपेक्षा आहे. पेट्रोलियम अँड नॅचरल गॅस रेग्युलेटरी बोर्डने तेलंगणा, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, कर्नाटक आणि गोवा या सहा राज्यांमध्ये तीन महत्त्वपूर्ण एलपीजी पाइपलाइन प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. सरकारी कंपनी गेल इंडिया लिमिटेडकडून हे प्रकल्प विकसित केले जाणार आहेत. सध्या सुमारे ७,७०० किलोमीटर असलेले अधिकृत एलपीजी पाइपलाइन नेटवर्क या प्रकल्पांनंतर जवळपास ९,५०० किलोमीटरपर्यंत पोहोचणार आहे. भारत एलपीजीसाठी मोठ्या प्रमाणात आयातीवर अवलंबून आहे. आयात केलेला एलपीजी प्रथम किनारी टर्मिनलवर येतो आणि त्यानंतर देशातील विविध भागांतील वापर केंद्रांपर्यंत पोहोचवला जातो. त्यामुळे पाइपलाइन नेटवर्कचा विस्तार केल्याने देशांतर्गत एलपीजी वाहतूक क्षमता आणि पुरवठ्याची विश्वासार्हता वाढण्याची शक्यता आहे. लांब पल्ल्याच्या एलपीजी वाहतुकीसाठी पाइपलाइन हा तुलनेने सुरक्षित आणि किफायतशीर पर्याय मानला जातो. एलपीजी टँकरच्या रस्ते वाहतुकीदरम्यान घडलेल्या गंभीर अपघातांच्या पार्श्वभूमीवर रस्ते मार्गावरील वाहतूक कमी करण्यावर नियामकाचा भर आहे. नवीन पाइपलाइनमुळे एलपीजीचा सुरक्षित आणि सातत्यपूर्ण पुरवठा मजबूत होण्यास मदत होणार आहे.

## थोडक्यात



### इकरा पब्लिक स्कूलमध्ये सद्भावना दिवस प्रतिज्ञा कार्यक्रम संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील इकरा पब्लिक स्कूल, माजलगाव येथे दि २० ऑगस्ट २०२६ रोजी सद्भावना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शाळेच्या प्रांगणात सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत सद्भावना दिवसाची प्रतिज्ञा घेण्यात आली.या कार्यक्रमाचे नेतृत्व मुख्याध्यापक शेख तौसिफ यांनी केले.मुख्यध्यापक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकता, बंधुता,सामाजिक सलोखा आणि परस्पर सद्भावना जपण्याचा संकल्प केला. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.



### निपाणी टाकळी ग्रामपंचायतीत अनियमिततेचे आरोप

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील निपाणी टाकळी ग्रामपंचायतीमध्ये मागील काही महिन्यांपासून मासिक सभा नियमितपणे घेण्यात आलेल्या नाहीत, तसेच ग्रामपंचायत कार्यालयातील उपस्थिती आणि कथित बोगस कामांच्या बिलांबाबत गंभीर अनियमितता होत असल्याचा आरोप उपसरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण सर्जेराव चव्हाण यांनी केला आहे. याबाबत त्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करून चौकशीची मागणी केली आहे.

**मासिक सभा,जयंती कार्यक्रम आणि विकासकामांबाबत चौकशीची मागणी**

चव्हाण यांच्या तक्रारीनुसार, एप्रिल, मे, जून आणि जुलै २०२६ या कालावधीत सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांनी मासिक सभा घेतली नसल्याचा आरोप आहे. ६ ऑगस्ट २०२६ रोजी सभा घेण्यात आली; मात्र सभेतील इतिवृत्त नोंदवहीतील नोंदी, मागील सभेची माहिती आणि कोरी ठेवण्यात आलेली पाने याबाबत समाधानकारक उत्तरे मिळाली नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. इतिवृत्त नोंदवहीतील काही पाने कोरी ठेवून नंतर त्यावर सह्या घेण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.भविष्यात खोटे ठराव करून बोगस कामे दाखविण्याची शक्यता असल्याची भीती चव्हाण यांनी व्यक्त केली असून, संबंधित प्रोसीडिंग बुकची रेकॉर्डिंग तसेच नोटीस बुकचे फोटो आपल्याकडे असल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.याशिवाय विविध महापुरुषांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच व ग्रामविकास अधिकारी उपस्थित नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. ग्रामविकास अधिकारी बीड येथे वास्तव्यास असून नियमितपणे ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहत नसल्याचा दावाही तक्रारीत करण्यात आला आहे.दरम्यान, कचरा कुंडीच्या खरेदीबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

## श्रीक्षेत्र नारायणगडच्या प्रमुख रस्त्याची चाळण भाविकांची कसरत, लोकप्रतिनिधी-प्रशासनाचे दुर्लक्ष

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील भाविकांचे श्रद्धास्थान आणि 'धाकटी पंढरी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायणगड देवस्थानाकडे जाणाऱ्या नवगण राजुरी ते नारायणगड प्रमुख रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्याने भाविक, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. धार्मिक कार्यक्रमांच्या निमित्ताने याच ठिकाणी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाची मोठी उपस्थिती असते; मात्र देवस्थानाकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्याच्या दुरवस्थेकडे दुर्लक्ष होत असल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे, लिंबागणेशकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

श्रीक्षेत्र नारायणगड हे बीड जिल्ह्यातील प्रमुख तीर्थक्षेत्रांपैकी एक असून वर्षभर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांना जिल्हाभरातून मोठ्या संख्येने भाविक येतात. त्यामुळे नवगण राजुरी ते नारायणगड हा प्रमुख रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र रस्त्याची दुरवस्था झाल्याने भाविकांना त्रास सहन करावा लागत असून अपघाताचा धोका देखील निर्माण झाला आहे. दि. ६ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत




'झाडे लावा, झाडे जगवा' आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याचे आवाहन करण्यात आले.प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे, असा प्रेरणादायी संदेशही देण्यात आला. मात्र त्याच जिल्ह्यातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्राकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्याची झालेली दुरवस्था प्रशासनाच्या निदर्शनास का येत नाही, असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

नारायणगड देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्याची तातडीने पाहणी करून खड्डे बुजविण्यासह आवश्यक ती डांबरीकरणाची कामे करण्यात यावीत.भाविकांच्या सुरक्षिततेचा विचार करून प्रशासनाने याकडे




गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी लोकप्रतिनिधी आणि जिल्हा प्रशासनाकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

तीन प्रमुख मागण्या

नवगण राजुरी-नारायणगड रस्त्याची तातडीने पाहणी करून दुरुस्ती करावी. रस्त्यावरील मोठे खड्डे तात्काळ बुजवून वाहतूक सुरळीत करावी. श्रीक्षेत्र नारायणगडच्या धार्मिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा विचार करून रस्त्याच्या कायमस्वरूपी सुधारणेसाठी निधी उपलब्ध करून द्यावा.

## आपण प्राप्त केलेल्या पदवीचा उपयोग समाज विकासाभिमुख व्हावा!-प्राचार्य डॉ विश्वास कदम

पाटोदा । प्रतिनिधी

आपण प्राप्त केलेल्या पदवीचा उपयोग समाज विकासाभिमुख व्हावा ! असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी केले.ते पाटोदा येथिल जयभवानी कला व विज्ञान महाविद्यालयात, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या बी.ए. व बी.एस्सी. पदवीधारक विद्यार्थ्यांच्या पदवी वितरण समारंभ प्रमुख पाहुणे म्हणुन ते बोलत होते.या समारंभास प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून श्री.शिवाजीराव पंडित कला व विज्ञान महाविद्यालय शिवाजीनगर,गढी चे प्राचार्य डॉ. विश्वास कदम उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे होते.

यावेळी महाविद्यालयातील बी.ए. आणि बी.एस्सी. अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या पदवीधारक विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. पदवी प्राप्त




झाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान दिसून येत होते.

प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी पदवीधर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, पदवी ही केवळ शिक्षण पूर्ण केल्याची पावती नसून भविष्यातील जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडण्याची प्रेरणा आहे, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी करावा, तसेच बदलत्या काळातील आव्हानांना सामोरे जाताना सातत्याने नवनवीन ज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी पदवीधर विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेत, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे नाव आपल्या कार्यातून उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. समारंभाच्या निमित्ताने महाविद्यालयात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पदवी वितरणाचा हा अविस्मरणीय क्षण विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांसाठीही अभिमानाचा ठरला.या प्रसंगी विद्यापीठ ध्वजासह पाहुणे व पदवीधर विद्यार्थी यांची रॅली काढुन वातावरण निर्मीती करण्यात आली.या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी कल्याण विभाग व परीक्षा विभागाच्या वत्तीने करण्यात आले होते.या पदवी वितरण समारंभाचे संचलन विद्यार्थी कल्याण विभागाच्या समन्वयक प्रा.डॉ. कल्पना घारगे यांनी केले तर आभार प्रा.डॉ.शिवाजी काकडे यांनी मानले.हा समारंभ यशस्वी करण्यासाठी प्रा.सोमनाथ घाडगे,प्रा. डॉ.सुनिल जाधव व प्रा. डॉ.प्रविण शिलेदार आदिनी अथक परिश्रम घेतले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी नव्या ध्येयाने, आत्मविश्वासाने आणि सामाजिक बांधिलकीने पुढील वाटचाल करावी, या शुभेच्छांसह पदवी वितरण समारंभाची सांगता झाली.

## आदित्य महाविद्यालयात 'स्वच्छता पंधरवडा' भव्य रॅली अन् वृक्षारोपण

### महाविद्यालयात ४३१ झाडांची लागवड; विद्यार्थ्यांकडून वृक्ष संगोपनाचा संकल्प

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या (छडड) संयुक्त विद्यमाने आदित्य कृषी महाविद्यालय, बीड येथे 'स्वच्छता पंधरवडा' अत्यंत उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. अभियानांतर्गत परिसर स्वच्छता मोहीम, भव्य जनजागृती रॅली आणि मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणाचा उपक्रम यशस्वीरीत्या राबवण्यात आला. यावेळी महाविद्यालय परिसरात तब्बल ४३१ वृक्ष लागवड करण्यात आली. लावलेले वृक्ष विद्यार्थ्यांकडून संगोपनाचा संकल्प करण्यात आला.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक,



विद्यार्थ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी एकत्र येत परिसर तसेच परिसरातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता केली. यानंतर विद्यार्थ्यांनी हातात स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, प्लास्टिक मुक्ती आणि जलसंरक्षणाचे संदेश देणारे फलक घेऊन भव्य जनजागृती रॅली काढली. या रॅलीद्वारे नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. या मोहिमेचा मुख्य भाग म्हणून महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. परिसर हिरवागार करण्याच्या उद्देशाने अभियानादरम्यान एकूण ४३१ झाडांची लागवड करण्यात आली. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी केवळ झाडे लावली नाहीत, तर त्यांचे नियमित संगोपन व संवर्धन करण्याची शपथही घेतली. हा उपक्रम आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. श्याम भुतडा यांच्या उत्तम नियोजनामुळे संपूर्ण पंधरवड्याला व्यापक स्वरूप प्राप्त झाले.

**परभणी कृषी विद्यापीठाकडून विशेष अभिनंदन**

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी छडड कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रसाद खेडकर, प्रा. वैशाली मिसाळ, डॉ. निर्मला ठोके, प्रा. सातपुते, प्रा. राऊत आणि प्रा. धावणे यांनी परिश्रम घेतले. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ (परभणी) चे संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम आणि क्रीडा अधिकारी डॉ. शृंगारे यांनी महाविद्यालयाच्या या सामाजिक उपक्रमाचे विशेष कौतुक करून अभिनंदन केले.

## चांगल्या गुणांचा संग्रह झाल्यासच नेतृत्व क्षमता निर्माण होते- विष्णु सोनवणे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

चांगल्या गुणांचा संग्रह झाल्यासच योग्य दिशेने वाटचाल होऊन नेतृत्वाची क्षमता निर्माण होते त्यासाठी साधना महत्वाची असल्याचे मत भा.शि.प्र.संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य,मुख्याध्यापक विष्णु सोनवणे यांनी व्यक्त केले. बुधवार १९ ऑगस्ट रोजी येथील क्षेत्र अमृतेश्वर मंदीर परिसरात आयोजित खोलेश्वर प्रा. विद्यालयाच्या नेतृत्व गुण विकास शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी स्थानिक विद्यासभा संयोजिका सौ.सुनिता सोनवणे, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख सौ.ममता लांडगे,सहशिक्षक संतोष आडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्वगुण,जबाबदारी, व्यक्तिमत्व विकास, प्रामाणिकपणा, धाडस,सत्य,अहिंसा आदी बाबत गोष्टी रूपाने मार्गदर्शन केले. शिक्षक विठ्ठल गुट्टे यांनी पर्यावरणाचे संरक्षण,प्लास्टिकचा वापर टाळणे,परिसर स्वच्छता,पर्यावरण संवर्धन,निसर्गाचे रक्षण,पर्यावरणपूरक जीवनशैली ही प्रत्येकाची जवाबदारी असल्याचे सांगितले. सौ.सुनिता सोनवणे यांनी पर्यावरणातील औषधी वनस्पती व निसर्गाच्या सौंदर्याबद्दल माहिती सांगून संस्कारक्षम कुटुंबातूनच जबाबदार,शिस्तप्रिय आणि संवेदनशील नागरिक घडतात त्यासाठी कुटूंब प्रबोधन अत्यंत महत्वाचे असल्याचे त्या म्हणाल्या. सौ.प्रिती शिंदे यांनी प्लास्टिक पासून होणारे दुष्परिणाम, स्वदेशीचा वापर या बाबतची माहिती सांगून विद्यार्थ्यांना कापडापासून पिशवी तयार करण्याची कार्यशाळा घेतली. संतोष आडे म्हणाले की,विद्यार्थ्यांनी संघभावना,परस्पर सहकार्य, निर्णयक्षमता, संवादकौशल्य आणि संघटन कौशल्य आदी गोष्टी आत्मसात कराव्यात. केंद्रीय कार्यकारिणी सदस्या वर्षा मुंडे यांनी शिबीरास भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

शालेय समितीचे अध्यक्ष उन्मेष मातेकर यांचेही मार्गदर्शन लाभले. सातवीतील राजेभाऊ अमोल मस्के या विद्यार्थ्याने सर्व विद्यार्थ्यांना पर्यावरण प्रतिज्ञा दिली. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन या विषयावर नाटिका केली.

शिबिरात जवळपास साठ विद्यार्थी सहभागी झाले होते.

## गरजूंसाठी आशेचा किरण; स्वाराती ग्रामीण रुग्णालय ठरतेय गोरगरिबांचा आधारवड

माजलगाव । प्रतिनिधी

**गोरगरीब आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी अंबाजोगाई येथील स्वाराती ग्रामीण रुग्णालय हे खऱ्या अर्थाने आधारवड ठरत आहे. विशेषत: डोळ्यांच्या विविध आजारांवरील उपचार आणि शस्त्रक्रिया येथे पूर्णपणे निशुल्क केल्या जात असल्याने आर्थिक परिस्थितीमुळे उपचारापासून वंचित राहणाऱ्या असंख्य रुग्णांना मोठा दिलासा मिळत आहे.**

स्वाराती ग्रामीण रुग्णालयातील आपल्या अनुभवाबद्दल बोलताना शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी सांगितले की, खासगी रुग्णालयात ज्या डोळ्यांच्या ऑपरेशनसाठी साधारण ३५ ते ४० हजार रुपये खर्च येतो, ते ऑपरेशन स्वाराती ग्रामीण रुग्णालयात माझे पूर्णपणे निशुल्क झाले. फक्त ये-जा आणि इतर किरकोळ खर्चासाठी सुमारे ८०० रुपये खर्च झाले. त्यामुळे ८०० रुपये हा ऑपरेशनचा खर्च नसून रुग्णाचा ये-जा व इतर वैयक्तिक खर्च आहे, हे स्पष्ट करणे गरजेचे आहे.

थावरे यांनी सांगितले की, त्यांच्या ऑपरेशनच्या वेळी त्यांच्यासोबत सामान्य कुटुंबातील सुमारे २५ ते ३० रुग्ण होते. येथे महिन्याला जवळपास २०० ते २५० आणि वर्षाला सुमारे २५०० रुग्णांवर डोळ्यांच्या शस्त्रक्रिया केल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले.नेत्रसेवेत कार्यरत डॉ. एकनाथ शेळके यांच्या कार्याचे थावरे यांनी विशेष कौतुक केले. डॉ. एकनाथ शेळके हे बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र आहेत. अनेक वर्षांपासून ते नेत्रसेवेत कार्यरत



असून त्यांच्या हातून मोठ्या प्रमाणावर डोळ्यांच्या शस्त्रक्रिया झाल्या आहेत, असे त्यांनी सांगितले.विशेष म्हणजे, नेत्रशस्त्रक्रियांच्या संख्येच्या बाबतीत डॉ. एकनाथ शेळके यांनी महाराष्ट्रातील प्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. लहाने यांच्या कामगिरीलाही मागे टाकत मोठी कामगिरी केली आहे, असा दावा भाई गंगाभिषण थावरे यांनी केला. त्यामुळे ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या या डॉक्टरांच्या कामाची व्याप्ती आणि योगदान किती मोठे आहे, याची कल्पना येते.ग्रामीण भागात राहून अत्यंत शांतपणे आणि धिम्या गतीने मोठे स्वप्न साकारण्याचे काम डॉ. शेळके करत आहेत. त्यांना फोन केला तर ते रुग्णाला अंबाजोगाई मेडिकल कॉलेजमध्ये येण्यास सांगतात सोमवारी या, शुक्रवारी या, तुमचे ऑपरेशन होऊन जाईल,' अशा आपुलकीने ते रुग्णांना मार्गदर्शन करतात. हीच खरी रुग्णसेवा आहे, असे थावरे म्हणाले. रुग्णालयातील डॉक्टर, सिस्टर, वैद्यकीय विद्यार्थी तसेच स्वच्छता, भोजन आणि इतर विभागांतील सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवाभावी वृत्तीचेही थावरे यांनी कौतुक केले.रुग्णालयातील स्वच्छता चांगली असून रुग्णांसाठी दिले जाणारे जेवणही उत्तम असल्याचे त्यांनी सांगितले. इथला स्टाफ रुग्णांशी घरच्या माणसासारखा वागतो. उपचारासोबत रुग्णांना आपुलकी आणि मानसिक आधार मिळतो, असे ते म्हणाले.रुग्णालयाचे विभागप्रमुख दराडे यांच्या कार्याचेही त्यांनी कौतुक केले. दराडे साहेब हे आपल्या मराठवाड्यातील परभणीचे आहेत. रुग्णसेवेकडे पाहण्याची त्यांची भूमिका आणि रुग्णांशी असलेला आपुलकीचा संवाद कौतुकास्पद आहे, असे थावरे यांनी नमूद केले.ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी सरकारी आरोग्य व्यवस्था सक्षम असणे ही काळाची गरज आहे. खासगी रुग्णालयातील हजारो रुपयांचा खर्च परवडत नसलेल्या कुटुंबांसाठी स्वारातीसारख्या संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.स्वाराती ग्रामीण रुग्णालय हे रुग्णांसाठी खऱ्या अर्थाने आशेचा किरण आहे. येथे गरीब आणि सामान्य माणसाला सन्मानाने, आपुलकीने आणि निशुल्क उपचार मिळतात. त्यामुळे अशा संस्थांना आपण जपले पाहिजे, त्यांना अधिक सक्षम केले पाहिजे. सरकारी आरोग्यसेवा सक्षम झाली, तर गरीबांच्या डोळ्यातील अश्रू थांबतील आणि त्यांच्या डोळ्यांत पुन्हा आशेचा प्रकाश दिसेल, असे आवाहन भाई गंगाभिषण थावरे यांनी केले.

## पान ६ वरुन...

### बिंदुसरा बंधाऱ्यामुळे बीडचा

येत्या ऑक्टोबर महिन्यात कोणत्याही परिस्थितीत पाणी अडवलेच पाहिजे, अशा सक्त सूचना दिल्या आहेत.

शहराची गरज ओळखून प्लॅन मध्ये अंशतः बदल

आ. संदीप क्षीरसागर यांनी सातत्याने प्रयत्न करीत हा पूलकम बंधारा मंजूर करून आणला त्याचे काम प्रगतीपथावर आहे. दरम्यान बंधार्याच्या अगोदरच्या प्लॅनमुळे पाणी साठवणूक कमी होत असल्याचे लक्षात येताच आ. संदीप क्षीरसागर यांनी पुन्हा बंधाऱ्याचा प्लॅन बदलून घेतला आहे. यामुळे आता पाणी साठवणूकीत लक्षणीय वाढ होणार आहे आणि परिणामी बंधार्याच्या ५ कि.मी. च्या परिघात भूजल पातळीत मोठी वाढ होणार आहे. त्यामुळे पाण्याच्या बाबतीत बीड शहराला मोठा फायदा होणार आहे.

शहरातील ड्राय झोन होणार पाणीदार

शहरातील काही भागात ५० ते ६० फुटावर पाणी लागतो व जवळपास १५० फूट बोअर घेतले तरी उन्हाळ्यात ही राहातं मात्र शहरातील अंकुशनगर, संत नामदेव नगर, तेलगाव नाका, दारुल उलूम ते बायपास हा भाग ड्राय झोन मानला जातो, ३०० फूट बोअर घेतले तरी पाणी लागत नाही. यामुळे आता या पूलकम बंधार्याने पाणी अडल्यानंतर भूजल पातळीत वाढ होऊन हा ड्राय झोन ही निश्चितपणे पाणीदार होणार आहे अशी माहिती आ. संदीप क्षीरसागर यांनी दिली.

### खांडेपारगाव शिवारात

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशाने खांडेपारगाव शिवारात सापळा रचण्यात आला.

संशयित इनोव्हा कार (क्रमांक चक१२ ऋ्ल १९५२) कच्च्या रस्त्यावर दिसून येताच पोलिसांनी छापा टाकला. पोलिसांना पाहताच कारमधील पुढील सीटवर बसलेला एक जण गाडी थांबवून शेतात पळून गेला, तर दुसरा आरोपी जागीच पोलिसांच्या हाती लागला. वाहनाची कसून झडती घेतली असता मागील सीटवर विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा आढळून आला. पोलिसांनी कार व गुटखा असा एकूण ८,५५,९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी आरोपी सचिन भीमराव माटे (वय ३४, रा. भीमनगर गेवराई) व फरार झालेला रशीद सय्यद (रा. उमापूर, ता. गेवराई) या दोघांविरुद्ध पिंपळनेर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १२३, २७३, २७४, २२३, ३(५) अन्वये गुन्हा (गु.र.नं. २५९/२०२६) दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पिंपळनेर पोलीस करत आहेत. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, अर्जुन यादव, गोविंद राख, अश्पाक सय्यद, मनोज परजणे, बबन सलगर आणि चालक नितीन वडमारे यांच्या पथकाने केली.

### पाच गावांतील १३ शेतकऱ्यांचा

आले.अल्पदरात नोंदणी करून कृषी विज्ञान केंद्र, बारामती यांच्याकडून प्राप्त उच्च दर्जाच साहित्य कारखान्याने शेतकऱ्यांच्या ऊस प्लॉटवर उपलब्ध करून दिले.तेलगाव खुर्द येथे ए.आय तंत्रज्ञानाचा वापर केलेल्या ऊस प्लॉटची प्रत्यक्ष पाहणी दि १९ ऑगस्ट बुधवार रोजी करण्यात आली. व्हाट्सअपचा

माध्यमातून विशेष पचा वापर करून व्हीएसआय आणि बारामती येथील कृषी विज्ञान केंद्रातील ऊस शास्त्रज्ञांकडून दररोज सकाळी मार्गदर्शनपर संदेश पाठविले जातात.त्यानुसार संबंधित शेतकऱ्यांकडून ऊस पिकातील कामे करून घेतली जातात. ए.आय तंत्रज्ञानाच्या वापरामुळे पाण्याची सुमारे ७५ टक्के बचत होत असून, ठिबकद्वारे योग्य व अचूक खत मात्रा देण्याचे नियोजन करता येते.सहा महिन्यांत ऊस पिकात १० ते १८ फुटवे आणि १५ ते १८ कांड्यांची वाढ दिसून येत आहे. त्यामुळे ए.आय तंत्रज्ञानाचा ऊस उत्पादनवाढीसाठी मोठा फायदा होत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकरी उत्तम घाटूळ,प्रमोद कदम आणि उद्धव सोळंके यांच्या शेतातील ऊसाची सहा महिन्यांत झालेली वाढ व प्रगती उपस्थित शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पाहिली. या पाहणीनंतर आगामी ऊस लागवड हंगामात ए.आय तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्धार उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केला.या वेळी कारखान्याचे असिस्टंट जनरल मॅनेजर दत्तात्रय आहेरकर व सहाय्यक ऊस विकास अधिकारी विविध विभागांचे विभागप्रमुख, कृषी सहायक, कर्मचारी, शेतकरी मोठ्या संख्येन उपस्थित होते.

### कमरेला गावठी कट्टा

पथकाने तातडीने हॉटेलवर छापा टाकला. तेथे संशयास्पदरीत्या बसलेल्या तरुणाला ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता, त्याच्याजवळ ३२ हजार रुपये किमतीचा एक गावठी कट्टा आणि दोन जिवंत काडतुसे मिळून आली. पोलिसांनी विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव शुभम भारत वाघमारे (वय १९, रा. नाकलगाव, ता. माजलगाव, जि. बीड) असे सांगितले. याप्रकरणी आरोपीविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३३८/२०२६, कलम ३/२५ भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास अंबाजोगाई शहर पोलीस करत आहेत. ही धडक कामगिरी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषीकेश शिंदे व पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारूती कांबळे, विष्णु सानप, रामचंद्र केकान, गोविंद भताने, पोलीस अंमलदार सचिन आंधळे आणि चालक अतुल हराळे यांच्या पथकाने केली.

### समाजरत्न पुरस्काराने

केलेल्या विशेष कार्याबद्दल त्यांना समाजसेवा संघर्ष यौध्दा हा पुरस्कार उपस्थित मान्यवरांच्या प्रदान करून सन्मानित करण्यात आले. गेल्या कांही वर्षापासुन समाजसाठी अविरत कार्य करत असुन, समाजाच्या उन्नतीसाठी ते सदैव तत्पर असतात. त्यांच्या नि:स्वार्थ समाजसेवेचा अनेक गरजुंना प्रत्यक्ष लाभ झालेला आहे.त्यामुळे यांना दिलेला पुरस्कार सार्थ असल्याच्या प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त करत याबद्दल नवनाथ कांबळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करत आहेत.



राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
रविवार दि.२३ ऑगस्ट २०२६





# नियमित कर्जदारांना २ लाख देण्यासह शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी मुबईत २७ ऑगस्टला आदोलन-तुपकर

मुंबई / प्रतिनिधी

नियमित कर्जदारांना २ लाख प्रोत्साहन अनुदान देण्यासह शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांसाठी मुंबईत २७ ऑगस्टला आंदोलन करणार असल्याची घोषणा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी केली आहे. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख प्रोत्साहन अनुदान देण्याची प्रमुख मागणी त्यांनी उचलून धरली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील त्रुटी आणि योजनेपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नी त्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. पुढील सात दिवसांत सरकारने आमच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर मंत्रालय परिसरातील मंत्र्यांचे बंगले आणि शासकीय वाहनांचा प्रतिकात्मक जाहीर लिलाव करु, असा इशारा त्यांनी दिला आहे. नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांऐवजी २ लाख रुपये प्रोत्साहन अनुदान देण्यात यावे, अशी आमची प्रमुख मागणी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. नियमित कर्ज भरून त्यांनी गुन्हा केला आहे का? असा सवाल त्यांनी केला आहे. आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वंचित ठेवू नये. त्याचबरोबर २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफीपासून वंचित राहिलेले पात्र शेतकरी, तसेच यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांमधून काही कारणांमुळे लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांचा २०२६ च्या कर्जमाफी योजनेत समावेश करण्याची मागणी त्यांनी केली आहे. कर्जाचे पुनर्गठन केल्यामुळे कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचाही या योजनेत समावेश करावा. अनेक शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय बँकांनी कर्जाचे पुनर्गठन केले आहे, असा आरोप त्यांनी केला आहे. तडजोडीच्या ओटीएस प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांचे सिबिल खराब होऊ नये, यासाठी सरकारने भारतीय रिझर्व्ह बँकेशी चर्चा करून स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणीही त्यांची आहे. याआधी त्यांनी जून महिन्यात अन्नत्याग आंदोलन, त्यानंतर मुंबईत विधानभवनासमोर सोयाबीन, कापूस फेकून आंदोलन केले होते. त्यानंतर त्यांच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक झाली होती. त्यांच्या काही मागण्यांवर सकारात्मक चर्चा झाली होती. पण तरीही कर्जमाफी योजनेतील अनेक प्रश्न कायम असल्याचे तुपकर यांचे म्हणणे आहे.




### महत्वाच्या घटना

१८३९ : युनायटेड किंगडमने हाँगकाँगचा ताबा घेतला.
१९१४ : पहिले महायुद्ध जपानने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४२ : मो. ग. रांगणेकर यांच्या 'कुलवधु' नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९४२ : दुसरे महायुद्ध स्टालिनग्राडची लढाई सुरू
१९६६ : 'लूनार ऑर्बिटर-१' या मानवरहित अंतराळयानाने चंद्रावरून पहिल्यांदाच पृथ्वीची छायाचित्रे काढली.
१९९० : आर्मेनियाने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे जाहीर केले.
१९९१ : वर्ल्ड वाईड वेब सार्वजनिक उपयोगासाठी सुरु झाले.
१९९७ : हळदीच्या पेटंटबाबतचा अमेरिकेशी चालू असलेला कायदेशीर लढा भारताने जिंकला. एखाद्या विकसनशील देशाने अमेरिकन पेटंटला आव्हान देऊन तो जिंकण्याची ही पहिलीच घटना आहे.
२००५ : कविवर्य विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान
२०११ : लीबीयातील हुकुमशहा मुअम्मर गडाफीची सत्ता उलथण्यात आली.
२०१२ : राजस्थानात अतिवृष्टीमुळे ३० जण ठार!

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७५४ : लुई (सोळावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २१ जानेवारी १७९३)
१८५२ : भारतीय वैद्य आणि दानकर्ते राधा गोबिंद कार यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९१८)
१८७२ : भारतीय वकील आणि राजकारणी तांगुतरी प्रकाशम यांचा जन्म. (मृत्यू: २० मे १९५७)
१८७५ : भारतीय स्वतंत्रतासेनानी व चंपारण्य संग्रहाचे प्रमुख सदस्य राजकुमार शुक्ल यांचा जन्मदिन.
१८९० : न्यूज-डे चे सहसंस्थापक हॅरी फ्रँक गग्रेहॅम यांचा जन्म. (मृत्यू: २२ जानेवारी १९७१)
१९१८ : गोविंद विनायक तथा 'विंदा' करंदीकर लेखक, कवी, लघुनिबंधकार व टीकाकार.
१९४४ : सायरा बानू चित्रफट अभिनेत्री
१९५१ : नूर जॉर्डनची राणी
१९७३ : मलाईका अरोरा खान मॉडेल व अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

६३४ : अबू बकर अरब खलिफा (जन्म: ? ? ५७३)
१३६३ : डहाण राजवटीचे संस्थापक चेन ओंलियांग यांचे निधन.
१८०६ : चार्ल्स कुलोम फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १४ जून १७३६)
१८९२ : ब्राझीलचे पहिले अध्यक्ष डियोडोरो डा फोन्सेका यांचे निधन. (जन्म: ५ ऑगस्ट १८२७)
१९७१ : रतन साळगावकर ऊर्फ हंसा वाडकर मराठी व हिन्दी चित्रपट अभिनेत्री (सांगत्ये ऐका, लोकशाहीर रामजोशी, विजयाची लग्ने, संतसखू, रामशास्त्री, आजाद, नवजीवन, धन्यवाद, मेरे लाल). 'सांगत्ये ऐका' नावाचे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिद्ध आहे. (जन्म: २४ जानेवारी १९२४)
१९७४ : डॉ. शंकर दामोदर पेंडसे मराठी ग्रंथकार आणि संतसाहित्याचे गाढे अभ्यासक. पंढरपूर येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे (१९५५) ते अध्यक्ष होते. (जन्म: २८ फेब्रुवारी १८९७)
१९७५ : पं. विनायकराव पटवर्धन नामवंत शास्त्रीय गायक, गुरू, संगीतप्रसारक व अभिनेते. १९३२ मध्ये त्यांनी पुण्यात गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली. (जन्म: २२ जुलै १८९८)
१९९४ : आरती साहा इंग्लिश खाडी पोहून जाणारी पहिली भारतीय महिला जलतणपटू (जन्म: २४ सप्टेंबर १९४०)
१९९७ : ग्रेनाडा चे पहिले पंतप्रधान एरिक गेयरी यांचे निधन. (जन्म: १८ फेब्रुवारी १९२२)
२००३ : भारतीय कन्नड भाषिक लेखक ए. एन. मूर्ती राव यांचे निधन.
२०१३ : आर.जे. कॉमन रेल्वेमार्ग गटाचे संस्थापक रिचर्ड जे. कॉर्मन यांचे निधन. (जन्म: २२ जुलै १९५५)

# सोन्याप्रमाणे चमकणारी 'सोनपरी शेळी'

भारतामध्ये शेळ्यांच्या अनेक जातींमध्ये सोनपरी शेळीची जात खूप लोकप्रिय आहे. या जातीच्या शेळीपालनातून शेतकऱ्यांना चांगला आर्थिक नफा मिळवता येतो.

सोनपरी शेळीची वैशिष्ट्ये : सोनपरी शेळी ही बेरारी शेळी आणि ब्लॅक बंगाल या दोन शेळीच्या संकराने तयार झाली आहे. या शेळीची खास गोष्ट म्हणजे या शेळीची कातडी चमकदार असल्यामुळे ही सोन्यासारखी दिसते त्यामुळे तिला सोनपरी असे म्हणतात. ही शेळी प्रामुख्याने मांसासाठी पाळली जाते. त्याच्या मांसाला बाजारात चांगली मागणी आहे.

शरीर रचना : सोनपरी जातीच्या शेळीचा रंग तपकिरी किंवा काळा असतो. त्याच्या मागच्या बाजूला डोक्यापासून शेपटीपर्यंत एक काळी रेष असते ज्यामुळे ती अधिक उठून दिसते. त्याच्या मानेवर एक काळे वर्तुळ असते. शेपटी मागे वक्र झालेली असते. कान पानाच्या आकाराचे असून खालच्या दिशेने वाकलेले असतात. शिंग चपटे असून बाहेरच्या बाजूस पसरलेले असतात. या शेळीचे वजन साधारणपणे ३५ ते ४० किलो असते. ही शेळी दरवर्षी ३ ते ४ पिलांना जन्म देते. त्यामुळे लहान पशुपालक अल्पावधीत या शेळीचे पालन करून लाखो रुपये सहज कमवू शकतात.

सोनपरी शेळीची किंमत : सोनपरी शेळीच्या मांसाला बाजारात चांगली मागणी असल्याने त्याची किंमतही बाजारात चांगली आहे. इतर शेळ्यांच्या तुलनेत सोनपरी बोकडाची बाजारातील किंमत २२ ते २५ हजार रूपयांपर्यंत आहे. अशा परिस्थितीत या शेळीचे पालनपोषण करून चांगले उत्पन्न मिळू शकते.

सोनपरी शेळीची देखभाल : सोनपरी शेळीच्या देखभालीसाठी विशेष व्यवस्था करावी लागत नाही. घराच्या एका कोपर्यातही बांधून ठेवू शकता. ही शेळीही झाडाची पाने खाऊन जगते. याशिवाय फळे, भाज्या, हिरवे गवत इत्यादी खाते. सोनपरी शेळी उष्ण व कोरड्या हवामानात सहज राहू शकते.



# पावसाळ्यात पिकांमध्ये बुरशी टाळण्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला




पावसाळ्याच्या दिवसांत हवेतील अति-आर्द्रता, सूर्यप्रकाशाची कमतरता आणि साचणारें पाणी यामुळे पिकांवर बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होतो. पिकांचे नुकसान टाळण्यासाठी कृषी तज्ज्ञांनी दिलेल्या काही महत्त्वाच्या उपाययोजना आज आपण पाहणार आहोत.शेतातील पाण्याचा निचरा : अतिरिक्त पाणी बाहेर काढा: शेतात जास्त वेळ पाणी साचून राहिल्यास पिकांची मुळे सडतात आणि मूळकूज किंवा दांडकूज सारखे रोग होतात. त्यामुळे शेतातून पाण्याचा त्वरित निचरा होईल अशी व्यवस्था करा. शेताच्या कडेने व ओळींच्या मध्ये छोटे चर खोदा जेणेकरून अतिरिक्त पाणी वाहून जाईल.

पूर्वोपाय व जैविक व्यवस्थापन : पेरणी किंवा पुनर्लागवडीपूर्वी बियाण्याला रासायनिक बुरशीनाशकाची प्रक्रिया नक्की करा. जमिनीतील बुरशी रोखण्यासाठी ट्रायकोडेर्मा किंवा स्युडोमोनाससारख्या जैविक घटकांचा वापर सेंद्रिय खतात मिसळून जमिनीतून द्या.

रासायनिक बुरशीनाशकांची फवारणी : बुरशीचा प्रादुर्भाव दिसताच किंवा ढगाळ वातावरणात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून फवारणी करा. कॉपर ऑक्सिक्लोराईड किंवा मॅन्कोझेब २ ते २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारा. जर रोग पसरला असेल तर कार्बेंडाझिम, टेब्युकोनॅझोल किंवा अझॉक्सिस्ट्रोबिन यांसारख्या बुरशीनाशकांचा डॉक्टरांच्या/ तज्ज्ञांच्या सल्ल्याने वापर करा. पावसाळ्यात फवारणी करताना द्रवात स्टिकर नक्की मिसळा, जेणेकरून औषध पानांवर टिकून राहील आणि पावसामुळे धुवून जाणार नाही.


हवा खेळती ठेवणे व शेताची स्वच्छता : झाडांची दाटी झाली असल्यास किंवा खालील पिवळी/रोगट पाने काढून टाका, जेणेकरून झाडांमध्ये हवा व सूर्यप्रकाश खेळता राहील. बुरशीने बाधित झालेली पाने, फळे किंवा फांद्या शेताबाहेर नेऊन नष्ट करा.

संतुलित खत व्यवस्थापन : नत्राचा अतिवापर टाळा: पावसाळ्यात युरिया किंवा नत्रयुक्त खते जास्त दिल्यास पिके मऊ होतात आणि बुरशी लवकर पडते. पिकांची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी पोटॅशियम व कॅल्शियमचा योग्य वापर करा.

# हळदीवरील हुमणीचा प्रादुर्भाव रोखण्याचे उपाय

उसातील, मक्यावरील हुमणी अळीबद्दल आपण जागरुक राहतो. परंतु हुमणी ही हळद पिकावरही हल्ला करून कंदांचे, मुळांचे मोठ्या प्रमाणात नुकसान करत असते. त्यामुळे वेळीच हुमणीचा प्रादुर्भाव ओळखून त्यावर उपाय करणे आवश्यक आहे. हुमणी ही बहुभक्षीय कीड आहे. म्हणजेच ती केळी, ऊस, सोयाबीन, मका, हळद अशा पिकांमध्ये आक्रमण करते. हुमणी ही मुळातच जमिनीतील सेंद्रिय पदार्थांवर तिची उपजीविका करते. त्यामुळे ती पिकाचे मुळ हे तिचे मुख्य खाद्य बनते. या किडीची अळी अवस्था सर्वात नुकसानकारक असते. तिचे प्रौढ एप्रिल – मे महिन्यात वळवाचा पाऊस पडल्यानंतर पोषक वातावरणात सायंकाळी जमिनीतून बाहेर पडतात. कडूनिंब, बोर आणि बाभूळ अशा झाडांवर ते पाने खाण्यासाठी सायंकाळी जमा होतात. तर मादी झाडाच्या मुळांभोवतीतत जमिनीत अंडी घालते. तसेच शेणखत किंवा कुजत असलेल्या झाडांच्या पालापाचोळ्यात व कचऱ्यात देखील ती अंडी घालते. ही अंडी साबुदाण्यासारखी पांढरट पिवळसर रंगाची असतात.

हुमणीचा जीवनक्रम : हुमणीचा जीवनक्रम साधारणत: एका वर्षात पूर्ण होतो. अंडी घातल्यानंतर १५ ते २० दिवसात अळी बाहेर पडते. अळी ६ ते ८ महिन्यांच्या काळात पिकांच्या मुळांवरती तसेच शेतातील इतर सेंद्रिय घटकांवर वास्तव्य करुन ३ वेळेस कात टाकून पूर्ण वाढीच्या अस्थेत जाते. पूर्ण वाढ झालेली अळी १५ ते ३० सेंमी. खोल जमिनीत जाऊन स्वत:भोवती मातीचे



टनक आवरण तयार करते. यालाच कोश अवस्था म्हणतात. ही अवस्था साधारणत: १४ ते २२ दिवसांची असते. त्यातून पुढे भुंगेरा बाहेर पडतो. भुंगेऱ्याची प्रौढ अवस्था ही ४५ ते १०० दिवसांची असते.

हुमणीमुळे होणारे नुकसान : हुमणी सुरुवातीला जमिनीतील सेंद्रिय घटकांवर उपजीविका करतात. त्यानंतर त्या मुख्य पिकांच्या मुळांवर हल्ला करतात. जास्त प्रमाणात प्रादुर्भाव झाल्यास कंदही कुरतडले जातात. त्यामुळे हळदीचे पीक सुरुवातीला पिवळे पडते आणि नंतर रोप वाळू लागतात. असे प्रादुर्भावग्रस्त रोप उपटल्यास हातात सहज उपटून येते. त्यामुळे हळदीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.


एकात्मिक व्यवस्थापन : हुमणीच्या प्रभावी नियंत्रणासाठी केवळ फवारणीपेक्षा एकात्मिक व्यवस्थापन आवश्यक आहे. जसे हुमणीच्या जीवनक्रमानुसार उन्हाळ्यात शेतजमिनीची खोल नांगरट करावी. त्यामुळे जमिनीत असलेल्या कोश अवस्था सूर्यप्रकाशात उघड्या पडून मृत पावतात. सेंद्रिय निविष्ठांसाठी पूर्णपणे कुजलेले शेणखत वापरावे. पिकांचे अवशेष नष्ट करुन फेरपालट करावी. सायंकाळी बाहेर पडणारे भुंगेरे गोळा करुन नष्ट करावे. वळवाच्या पहिल्या पावसानंतर कडुनिंब, बोर आणि बाभळीवरील भुंगेरे खाली पाडून नष्ट करावे. प्रकाश सापळ्यांचा वापर करुन प्रौढ भुंगेरे नष्ट केल्यास नर मादी मिलन आणि अंडी घालण्याचे प्रमाण कमी होऊन पुढील प्रादुर्भावास आळा बसतो. यासाठी प्रकाश सापळ्यांचा वापर करावा. सायंकाळच्या वेळात भुंगेरे प्रकाशाकडे आकर्षित होतात. त्यामुळे प्रकाश सापळे लावून त्याखाली रॉकेलमिश्रित पाणी ठेवावे. यामुळे भुंगेऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होते.

जैविक उपाय : प्रतिबंधात्मक उपाय म्हणून किंवा प्रादुर्भाव झाल्यास जैविक पद्धतींचा अवलंब करावा. त्याकरिता मेटोरायझियम ॲनिसोप्ली २.५ किलो प्रति एकरी या प्रमाणात शेणखत किंवा इतर सेंद्रिय खतात मिसळावे. तसेच बिव्हेरिया बॅसियाना या जैविक कीटकनाशकाची ५ ते ६ ग्रॅम प्रति लिटर मिसळून फवारणी केल्यास प्रभावीपणे नियंत्रण करता येते.

रासायनिक उपाययोजना : हळद पिकामधील बेणेप्रक्रिया केल्यास हुमणीचा प्रादुभाव रोखण्यासही मदत होते. बेणेप्रक्रियेसाठी क्लोरोपायरीफॉस किंवा क्विनॉलफॉस २० ते ४० मिलि प्रति १० लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. या द्रावणात बेणे १० ते १५ मिनिटे बुडवून लागवड करावी. शेत तयार करताना लागवडीपूर्वी बेसल डोस टाकताना क्लोरअँट्रानिलिप्रोल ०.४ टक्के खतामधून ४ किलो प्रति एकर या प्रमाणात द्यावे. किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास क्लोरोपायरीफॉस २० मिली किंवा क्विनॉलफॉस २० मिली किंवा इमिडाक्लोप्रिड २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पिकांच्या मुळांभोवती आळवणी करावी.

# ब्रोकोली:सुधारित वाण, खत व्यवस्थापन व उत्पादन

ब्रोकोली ही फ्लॉवर वर्गातील एक उच्च पोषकमूल्य असलेली आणि बाजारात मोठी मागणी असलेली भाजी आहे. भारतामध्ये प्रामुख्याने थंड हवामानात (ऑक्टोबर ते मार्च) याची यशस्वी लागवड केली जाते. लागवडीच्या महत्त्वाच्या अटी : हवामानथंड हवामान (१५ ते २५ तापमान). जमीन चांगल्या निचऱ्याची मध्यम ते भारी जमीन (सामू ६.० ते ६.५). सुधारित वाण रोयल ग्रीन, फिएस्टा, लकी, ग्रीन मॅजिक. बियाण्यांचे प्रमाण३०० ते ४०० ग्रॅम प्रति हेक्टर. लागवडीचे अंतरओळींत ६० सेमी आणि रोपांमध्ये ४५ सेमी.



रोपवाटिका व्यवस्थापन : रोपे २५ ते ३० दिवसांत तयार होतात.गादीवाफ्यावर बियाणे पेरून रोपे तयार करा. रोपांचे किडींपासून संरक्षण करण्यासाठी ५०% शेडनेटचा वापर करावा. जमीन तयारी व खत व्यवस्थापन : जमिनीची सेंद्रिय ताकद वाढवा. शेताची २-३ वेळा उभी-आडवी नांगरणी करून २-३ ट्रॉली चांगले कुजलेले शेणखत मातीत मिसळा. वाफे किंवा सर्या तयार करताना १५०:८०:८० किलो प्रति हेक्टरी प्रमाणात रासायनिक खते द्या. पुनर्लागवड : संध्याकाळच्या वेळी लागवड करणे योग्य. ४ ते ५ पाने आलेली (२५-३० दिवसांची) रोपे तयार केलेल्या वाफ्यावर ठरवलेल्या अंतरावर लावावीत. पुनर्लागवडीनंतर लगेचच हलके पाणी द्यावे. पाणी व आंतरमशागत : ठिबक सिंचन अत्यंत प्रभावी ठरते. जमिनीच्या प्रकारानुसार ७ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पिकात तण होणार नाही याची काळजी घ्या आणि गरजेनुसार १-२ वेळा खुरपणी करून रोपांना मातीची जोड द्या. काढणी व उत्पादन : पुनर्लागवडीनंतर ६० ते ८० दिवसांत पीक तयार. ब्रोकोलीचे गड्डे पूर्ण घट्ट असताना आणि पिवळे पडण्यापूर्वी धारदार चाकूने कापून घ्यावेत. प्रति हेक्टरी १२ ते १५ टन उत्पादन मिळते.



राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत

रविवार दि. २३ ऑगस्ट २०२६





# अंतरवाली सराटीत राजकीय खलबते!

## अब्दुल सत्तार थेट जरांगेंच्या भेटीला; २९ ऑगस्टच्या उपोषणापूर्वी मध्यस्थीचा प्रयत्न?

जालना। प्रतिनिधी

**मराठा आरक्षणाच्या पेटत्या लढ्यादरम्यान जालन्यातील अंतरवाली सराटीत पुन्हा एकदा मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या आहेत. आगामी २९ ऑगस्टच्या उपोषणाची घोषणा झाल्यानंतर वातावरणातील उष्णता वाढली असतानाच, शिंदे गटाचे आमदार अब्दुल सत्तार यांनी अचानक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. नुकतेच संजय शिरसाट यांच्यावर जरांगेंनी केलेल्या गंभीर आरोपांनंतर सत्तारांच्या या सरप्राइज एंट्रीने राजकीय वर्तुळात सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. सत्तार या भेटीतून मध्यस्थीचा प्रयत्न करत आहेत का, अशी चर्चाही या निमित्ताने सुरू झालीय.**

सरकारच्या वतीने मध्यस्थी करण्यासाठी आणि आगामी आंदोलनाची तीव्र ताकद कमी करण्यासाठी सत्तार अंतरवालीत पोहोचल्याची चर्चा रंगली आहे. चर्चेदरम्यान अब्दुल सत्तार यांनी नमती आणि समंजस भूमिकाघेतल्याचे दिसले. जरांगेंना शांत राहण्याचे आवाहन करत सत्तार म्हणाले, 'मी इथे कोणत्याही राजकीय हेतूने नाही, तर एक मित्र म्हणून आलो आहे. संघर्ष टळावा हीच विनंती आहे. सरकार दोन पावले मागे-पुढे येण्यास तयार आहे, त्यामुळे तुम्हीही थोडा विचार करावा. समाजावर अन्याय होणार नाही याची काळजी सरकार नक्कीच घेईल.या भेटीदरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दलची आपली तीव्र नाराजी व्यक्त केली. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या धोरणांवर सडकून टीका करत जरांगे यांनी थेट सत्तारांसमोरच भाष्य केले. ''जे काही चुकतेय, ते वेळेत दुरुस्त करा,'' असा रोकठोक सल्ला जरांगेंनी सत्तारांना दिला. फडणवीस आणि शिंदे सरकारच्या



कारभारावर संताप व्यक्त करत, आरक्षणाचा तिढा लवकरात लवकर न सुटल्यास आंदोलन तीव्र होईल, असे संकेत जरांगेंनी दिले. मनोज जरांगे म्हणाले, आमचा निर्णय आता फायनल झाला असून २९ ऑगस्टपासून अंतरवालीतच आंदोलन सुरू होणार आहे. पण, जर सरकारने यात काही डाव टाकण्याचा प्रयत्न केला, तर आम्ही थेट मुंबईला धडक देऊ,'' असा इशारा जरांगे यांनी दिला. सत्तारांना सरकारने अधिकृतपणे चर्चेसाठी पाठवले असते तर सविस्तर सर्व गोष्टी सांगितल्या असत्या, असे म्हणत जरांगे यांनी आपल्या मनातील खंत सत्तारांसमोर बोलून दाखवली. तसेच, मराठा समाजाला ५८ लाख नोंदींचे प्रमाणपत्र द्या आणि केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष कृती करा, अशी मागणी त्यांनी पुन्हा एकदा लावून धरली. या भेटीत मनोज जरांगे यांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर नाराजी व्यक्त केली. ''मराठा समाजाने शिंदेंना खूप जीव लावला होता, मात्र त्यांच्याकडून आम्हाला अशी अपेक्षा नव्हती. फडणवीस आणि शिंदे यांनी आमच्यावर अन्याय होऊ द्यायला नको होता,'' अशी प्रतिक्रिया जरांगे यांनी व्यक्त केली. एवढेच नव्हे तर, आमदार संजय शिरसाट यांनी शिंदेंच्याच सांगण्यावरून मराठा आरक्षणाचे प्रमाणपत्र रद्द केले असल्याचा आरोपही जरांगे यांनी यावेळी केला. या संपूर्ण भेटीत सर्वात महत्त्वाचा मुद्दा ठरला तो म्हणजे २९ ऑगस्टपासून सुरू होणारे उपोषण. उपोषणाच्या ठिकाणाबाबत असलेल्या सर्व शंकांना पूर्णविराम देत मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले की, 'उपोषण अंतरवाली सराटीतच होईल. उपोषण सुरू असतानाच जर मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागला नाही, तर आम्ही तिथूनच थेट मुंबईकडे कूच करू!'. सत्तारांच्या या मध्यस्थीनंतर आणि जरांगेंनी दिलेल्या अंतिम इशाऱ्यामुळे आता राज्य सरकार २९ ऑगस्टपूर्वी काही ठोस निर्णय घेणार का, की मराठा आरक्षणाचा हा लढा पुन्हा एकदा मुंबईच्या वेशीपर्यंत धडकणार? याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

---

# पावसाअभावी जामखेड तालुक्यात दुष्काळाचे सावट

## कुकडीतून आवर्तन सीना नदीत सोडण्याची मागणी

जामखेड। प्रतिनिधी

जामखेड तालुक्यात यंदाच्या पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामावर मोठे संकट ओढवले आहे. जून व जुलै महिन्यात काही प्रमाणात पाऊस झाल्यानंतर शेतकऱ्यांनी जुलैमध्ये मोठ्या प्रमाणात पेरण्या केल्या. मात्र, जुलै अखेरपासून पावसाने पाठ फिरवल्याने तूर, उडीद, मूग, कापूस आणि सोयाबीनसह विविध खरीप पिके धोक्यात आली असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक शेतकऱ्यानी स्प्रिंकलर चा वापर करून पिके जगवण्याचा प्रयत्न करत आहेत. पावसाअभावी शेतातील पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके वाळू लागली आहेत. सुरुवातीच्या पावसावर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरण्या केल्या होत्या. मात्र, त्यानंतर सातत्याने पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. बियाणे, खते, मशागत आणि इतर शेती खर्च वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे.



तालुक्यात पिण्याच्या पाण्याची टंचाईही दिवसेंदिवस गंभीर बनत आहे. अनेक भागांमध्ये उपलब्ध पाणीसाठा कमी होत असून मध्यम प्रकल्प, तलाव तसेच साठवण तलावांची पाणीपातळी अत्यंत खालावली आहे. काही तलाव मृतसाठ्याच्या पातळीवर पोहोचल्याने आगामी काळात पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनत चालला आहे. पावसाअभावी चारा पिकांची वाढ झालेली नसल्याने पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. पाणी आणि चारा या दोन्ही समस्यांमुळे ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालक दुहेरी संकटात सापडले आहेत. दरम्यान, पावसाने लवकर हजेरी लावली नाही तर जामखेड तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर वरच्या कुकडी आवर्तनातून जामखेड तालुक्यातील सीना नदीत पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. शेतकऱ्यांच्या पिकांना दिलासा देण्यासाठी तसेच पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी तालुक्यातून होत आहे. पावसाने वेळेत साथ दिली नाही तर जामखेड तालुक्यावर दुष्काळाचे गडद सावट निर्माण होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत.

---

# ना.पंकजाताई मुंडेंच्या आश्वासनानंतर जालन्यात बंजारा समाज बांधवांनी आमरण उपोषण घेतले मागे

## मुख्यमंत्र्यांसोबत बैठक लावण्याचे आश्वासन

जालना । प्रतिनिधी

बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती अर्थात एसटी प्रवर्गात समावेश करून आदिवासी समाजाला मिळणाऱ्या सर्व शासकीय सवलती लागू कराव्यात, या प्रमुख मागणीसाठी गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेले आमरण उपोषण अखेर स्थगित करण्यात आले. पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी उपोषणकर्ते एकनाथ चव्हाण यांच्याशी फोनद्वारे संवाद साधून मुख्यमंत्री यांच्यासोबत बैठक लावण्याचे आश्वासन दिल्यानंतर चव्हाण यांनी उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. बंजारा समाज बांधव आणि उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांच्या हस्ते पाणी घेऊन



एकनाथ चव्हाण यांनी आपले आमरण उपोषण सोडले. यावेळी मोठ्या संख्येने बंजारा समाज बांधव आणि आंदोलक उपस्थित होते.बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गात समावेश करावा, तसेच आदिवासी समाजाला लागू असलेल्या सर्व शासकीय सवलती बंजारा समाजालाही लागू कराव्यात, या मागणीसाठी एकनाथ चव्हाण यांनी आमरण उपोषण सुरू केले होते.

पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज उपोषणकर्ते एकनाथ चव्हाण यांच्याशी फोनवरून संवाद साधला. सोमवारनंतर मुख्यमंत्री यांची वेळ घेऊन बंजारा समाजाच्या मागण्यांवर बैठक आयोजित करण्याचे आश्वासन त्यांनी दिल्याचे चव्हाण यांनी सांगितले. या आश्वासनानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.उपोषण स्थगित केल्यानंतर बोलताना एकनाथ चव्हाण यांनी सांगितले की, पंकजाताई मुंडे यांच्या शब्दांचा आम्ही आदर करीत असून, त्यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून आमरण उपोषण स्थगित करीत आहोत. यावेळी बंजारा समाजाचे अविनाश चव्हाण, उद्धव पवार, प्रकाश चव्हाण, आंदोलक संदेश चव्हाण यांच्यासह हजारो बंजारा समाज बांधव आणि आंदोलक उपस्थित होते.

---

# प्रेमाचा सल्ला देत भामट्याची हातचलाखी

## सेवानिवृत्त शिक्षकाची ६० हजार रुपये किंमतीची अंगठी पळवली

हिंगोली। प्रतिनिधी

काका, समोर चोरी झाले आहे. आम्ही पोलिस आहोत, तुम्ही तुमच्या अंगठ्या काढून ठेवा असा प्रेमाचा सल्ला देत एका भामट्याने सेवानिवृत्त शिक्षकाच्या हातातील अंगठी पळविल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी वसमत शहर पोलिस ठाण्यात शुक्रवारी ता. २१ रात्री उशीरा गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वसमत येथील पंचशिल नगर येथील रहिवासी असलेले सेवानिवृत्त शिक्षक गुंडीबा थोरात हे कामानिमित्त बाहेर गेले होते. सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास ते मदिना चौकातून पंचशिल नगरकडे जात होते. यावेळी एक भामटा त्यांच्याजवळ आला, काका आम्ही पोलिस आहोत, समोर चोरी झालेली आहे. तुमच्या हातातील अंगठ्या काढून ठेवा असा सल्ला दिला. मात्र सुरवातीला थोरात यांनी त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले.

मात्र याचवेळी त्या ठिकाणावर त्याचा साथीदार आला. भामट्याने त्याच्या साथीदाराला अंगठी काढून ठेवण्यात सांगितले. त्याने अंगठी काढून कागदात गुंडाळून खिशात ठेवली. यामुळे थोरात यांचा भामट्याच्या बोलण्यावर विश्वास बसला. त्यांनी त्यांच्या हातातील ६० हजार रुपये किंमतीची ६ ग्राम वजनाची सोन्याची अंगठी भामट्याजवळ दिली. त्याने हातचालाखी करून अंगठी काढून घेतली अन कागदात दगड गुंडाळून त्यांच्या हातात दिला. त्यांनी तो कागदाचा गुंडाळा खिशात ठेवला. त्यानंतर तो भामटा पसार झाला. दरम्यान, काही वेळाने थोरात हे घरी आल्यानंतर त्यांनी कागदाचा गुंडाळा उघडून पाहिला असता त्यात अंगठीच्या ऐवजी दगड दिसला. आपली फसवणुक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी सदर प्रकार त्यांच्या कुटुंबियांना सांगितला.

---

# नातवाच्या अपघाती मृत्यूची बातमी ऐकताच आजीनेही सोडला प्राण

लातूर। प्रतिनिधी

काही महिन्यांपूर्वी मुलाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता.हे दुःख ताजे असतानाच नातवाचाही अपघाती मृत्यू झाल्याची बातमी समजताच आजीनेही क्षणात प्राण सोडल्याची हृदयद्रावक घटना घडली. या घटनेने सूर्यवंशी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. उदगीर शहरातील नळेगाव रोडवरील उड्डाणपुलावर गुरुवारी रात्री दुचाकी कठड्याला धडकून पुलाखाली कोसळल्याने राजू ज्योतीराम सूर्यवंशी (वय २८) याचा जागीच मृत्यू झाला. राजूच्या अपघाती मृत्यूची माहिती त्याच्या कुटुंबीयांना मिळताच त्याच्या आजीला हा मोठा धक्का सहन झाला नाही. काही महिन्यांपूर्वीच मुलाचे निधन झाले होते आणि आता नातवाचाही मृत्यू झाल्याने दुःखाचा आघात सहन न झाल्याने आजीनेही प्राण सोडल्याचे सांगण्यात येत आहे.

या हृदयद्रावक घटनेनंतर शुक्रवारी राजूच्या मूळ गावी यशवंतवाडी (ता. रेणापूर) येथे आजी आणि नातवावर एकाच ठिकाणी, एकाच वेळी अंत्यसंस्कार करण्यात आले. एकाच कुटुंबातील दोन पिढ्यांना काही महिन्यांच्या अंतराने काळाने हिरावून नेल्याने अंत्यसंस्कारावेळी उपस्थितांचे डोळे पाणावले.

---


# वडिलांसोबतच्या त्या वादातून कुणालची आत्महत्या


## पोलिसांच्या तपासातून वेगळीच माहिती समोर

छ.संभाजीनगर। प्रतिनिधी

कुणाल चांदगुडे (१९) या तरुणाने काल (दिनांक २१) छत्रपती संभाजीनगरमधील खवड्या डोंगरावरून उडी मारून आत्महत्या केली. त्याला वाचवताना त्याचे वडील मुरलीधर चांदगुडे (४८) यांचाही मृत्यू झाला. तर डोळ्यांसमोर मुलगा आणि पती कोसळल्याचे पाहून आई संगीता चांदगुडे यांनीही डोंगावरून उडी घेतली. या घटनेत त्यांचाही मृत्यू झाला. कुणालने हे टोकाचे पाऊल आयफोनमुळे उचलले असल्याची चर्चा सुरू असतानाच आता पोलिस तपासात मात्र वेगळीच माहिती समोर आली आहे. कुणालच्या आत्महत्येचे आयफोन हे कारण असल्याचे प्राथमिक तपासात दिसत नाही, असे डीसीपी रत्नाकर नवले यांनी स्पष्ट केले आहे. व्हायरल व्हिडिओतील प्रत्यक्षदर्शी माजी सरपंच संजय जाधव यांनीही तेच सांगितले. मुलाला आयफोन हवा होता, अशी चर्चाच झाली नव्हती. उलट, त्याच्याकडे आधीपासूनच आयफोन होता. मात्र, या मुलाने नेमक्या कोणत्या कारणातून आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे.

आयफोन हवा होता म्हणून कुणालने आयुष्य संपवले, अशी घटनेनंतर सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली होती. मात्र, पोलिसांच्या प्राथमिक तपासात या चर्चेला दुजोरा मिळालेला नाही. आयफोन हे कुणालच्या आत्महत्येमागचे कारण असल्याचे प्राथमिक तपासात दिसून येत नाही, असे डीसीपी रत्नाकर नवले यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे आयफोनच्या मागणीमुळेच कुणालने टोकाचे पाऊल उचलल्याची चर्चा सध्या तरी





तथ्यहीन असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. माजी सरपंच संजय जाधव यांनी माध्यमांना सांगितले की, घटनास्थळी ते कुणालची समजूत काढण्याचा प्रयत्न करत होते. यावेळी त्यांनी, ''तुझ्याकडे आयफोन आहे, आई-वडील तुझे किती लाड करतात,'' अशा शब्दांत कुणालला समजावून सांगितल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, कुणालला आयफोन हवा होता आणि त्यासाठीच त्याने टोकाचे पाऊल उचलले, अशी कोणतीही चर्चा घटनास्थळी झाली नव्हती, असे संजय जाधव यांनी स्पष्ट केले. त्यामुळे आयफोन हे आत्महत्येचे कारण असल्याची चर्चा प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार घटनास्थळी झाली नव्हती. पोलिसांच्या प्राथमिक तपासातून वडिलांसोबत झालेला वाद हे एक महत्त्वाचे कारण समोर येत आहे. मात्र, हा वाद नेमका कशावरून झाला? त्या क्षणी वडील आणि मुलामध्ये नेमके काय बोलणे झाले? कोणत्या शब्दांनी परिस्थिती इतकी टोकाला गेली? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कुणाच्या मनात नेमके काय सुरू होते? या प्रश्नांची उत्तरे आता तपासातून मिळतील का, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. कारण या घटनेतील तीनही व्यक्ती आता या जगात नाहीत. घटनेच्या काही वेळ आधीपर्यंत ज्या घरात संवाद होता, राग होता, मतभेद होते, त्याच घरात आता केवळ शांतता उरली आहे. वडील नाहीत, आई नाही आणि ज्या मुलाभोवती या सगळ्या घटनेची कहाणी फिरतेय, तो मुलगाही नाही. त्यामुळे त्या कुटुंबाच्या आयुष्यात नेमके काय घडले, कोणत्या क्षणी परिस्थिती हाताबाहेर गेली आणि एका निर्णयाने संपूर्ण कुटुंबाचा अंत कसा झाला, याचे उत्तर कदाचित कायमच अनुत्तरित राहणार आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कुणालने याच डोंगरावर याआधीही आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्यावेळी एमआयडीसी वाळूज आणि चिकलठाणा पोलिसांनी त्याची समजूत काढून त्याला सुरक्षितपणे डोंगरावरून खाली आणले होते. मात्र, वर्षभरानंतर कुणालने पुन्हा हाच डोंगर गाठला. यावेळी आई-वडिलांनी अनेक विनवण्या करूनही तो ऐकण्यास तयार नव्हता. आई, पोलिस आणि घटनास्थळी उपस्थित नागरिकांनीही त्याला समजावण्याचा प्रयत्न केला.

### टीसी हरवला आहे

अनुज शिवदास तोंडे या नावाचा इयत्ता १२ वी पास चा टीसी वडवणी ते बीड प्रवासात हरवला आहे . सापडल्यास खालील नंबर वर संपर्क करा

९०७५६४४२७४

---

# विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढवण्यासाठी 'बुक डोनेशन कॅम्प'

## वाचन चळवळीला बळ देण्याचा सीईओ विवेक गायकवाड यांचा उपक्रम

हिंगोली। प्रतिनिधी

विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होऊन प्रेरणा मिळावी, वाचनाची सवय लावणे, वाचन चळवळ रुजविणे व वाढविणे यासाठी जिल्ह्यातील शाळांमधून बुक डोनेशन कॅम्प आयोजित केला जाणार असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी गुरुवारी तारीख २० दिली आहे. जिल्हा परिषदेत जिल्ह्यातील १३ शाळांमधून विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेटीचे वाटप करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.) समृद्धी दिवाणे, पुस्तक पेटी उपक्रमाचे प्रणेते अभिजीत जोंधळे, अभिजित लोहिया, शिक्षणाधिकारी मंजुश्री कल्लेवाड, उपशिक्षणाधिकारी आसावरी काळे, शिक्षणाधिकारी माध्यमिक विपुल भागवत यांच्यासह विभाग प्रमुख इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड म्हणाली की, शाळेतील विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण होऊन उत्तम वाचक निर्माण झाला पाहिजे, तसेच विद्यार्थ्यांना दर्जेदार पुस्तके वाचण्यात यावी या उद्देशाने विभाग प्रमुखांच्या पुढाकारातून पुस्तक पेटीचे वाटप करण्यात आले आहे. या अभिनव उपक्रमापासून एकही विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी सूचना त्यांनी केली. पुढील काळात जिल्ह्यातील शाळांमधून बुक डोनेशन कॅम्प आयोजित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी वाचून झालेली जुनी पुस्तके, संग्रहित केलेली पुस्तके बुक डोनेशन कॅम्पमध्ये जमा



करावीत. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना विविध विषयांवरील पुस्तके वाचनासाठी सहज उपलब्ध होतील. त्यामुळे नागरिकांनी जास्तीत जास्त पुस्तके दान करण्याचे आवाहन केले. सध्या जिल्ह्यामध्ये सहामाही सराव परीक्षा उपक्रम हाती घेण्यात आला असून, यात ६० हजार विद्यार्थ्यांची सकाळी दहा ते बारा या वेळेत परीक्षा घेण्यात येणार आहे. यातून विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना मिळून भविष्यात ते विविध स्पर्धा परीक्षांमध्ये गुणवत्ता मिळवून सर्वोच्च यश संपादन करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जिल्ह्यात मृद व जलसंधारणाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी २१ ऑगस्ट रोजी जलसंधारण दिन साजरा करण्यात येणार असल्यामुळे सर्व नागरिकांनी सहभाग नोंदवण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृद्धी दिवाणे यांनी केले. विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार पुस्तकाची निवड केली असून पहिली ते सातवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना आवडेल अशी पुस्तके एका पेटीमध्ये एकत्रित करून पुस्तक पेटीचे वाटप करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तर आज २०० व्या पुस्तक पेटीचे वितरण केले असून, पुस्तक पेटी उपक्रम अंबाजोगाई ते परळी, लातूर आणि हिंगोली जिल्ह्यात पसरला असल्याचे उपक्रमाचे प्रणेते अभिजीत जोंधळे यांनी स्पष्ट केले. यावेळी उपस्थित विभाग प्रमुखांनी मार्गदर्शन केले.

# संतप्त वडवणीकर रस्त्यावर, शहर कडकडीत बंद

## पोलिसांना पंधरा दिवसाचा अल्टिमेट, आरोपींना अटक करा, मोक्का लावा, आरोपींना फरार होण्यास मदत करणाऱ्या नेत्यांना सहआरोपी करा

वडवणी । प्रतिनिधी

काल सायंकाळी झालेल्या व्यापारी मारहाण व दुकानावर झालेल्या दगडफेकीच्या प्रकरणामुळे वडवणीत हिंदू-मुस्लिम वाद चव्हाट्यावर येऊन थांबला आहे. हे प्रकरण झाल्यापासून शहरात तणावपूर्व वातावरण निर्माण झाले आहे. आज सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास हिंदू समाजाच्या वतीने वडवणी शहराच्या मुख्य रस्त्यावर उतरून भव्य निषेध रॅली काढली. तर आरोपींना सहकार्य करणाऱ्या नेत्यांना देखील सहआरोपी करण्याच्या मागणीसह मुख्य आरोपीला पंधरा दिवसाच्या आत अटक करुन त्याच्यावर मोकोका लावावा अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा तमाम हिंदू समाजाच्या वतीने देण्यात आला आहे.

काल सायं. पाच वाजण्याच्या सुमारास वडवणी शहरातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील चौंडेश्वरी ड्रेसेसच्या दालना समोर झालेल्या प्रकार अत्यंत निंदनीय आहे. या प्रकारामुळे हिंदू मुस्लिम गट पडले आणि शहरातील वातावरण







तणावपूर्वक निर्माण झाले. या घटनेला १८ तासांपेक्षाही जास्त काळ झाला असून अजूनही वातावरण जैसे थेच पहावयास मिळत आहे. तर आज सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास हिंदू समाजाच्या बांधवांनी एकत्र येत रस्त्यावर उतरून चिंचवण रोडवरील चाटे चौक ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकापर्यंत निषेध रॅली काढत छत्रपती शिवाजी महाराज की, जय... जय श्रीराम... जय श्रीराम... घोषणा देत रॅली काढली. यारॅलीचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ठिय्या मांडून तहसील व पोलीस प्रशासनाला निवेदन देऊन संपन्न झाला. या दरम्यान या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करावी, गुन्हा दाखल झालेल्या आरोपींना ज्या कोण्या नेत्यांनी पळवून लावण्यात सहकार्य केले त्यांचा सीडीआर तपासून त्यांना देखील सह आरोपी करून गुन्हा दाखल करावा, तसेच या घटनेतील मुख्य आरोपी याला तात्काळ अटक करून त्याच्यावर मोकोका सारखे कलम लावून जेलबंद करावे अशी मागणी करत पंधरा दिवसांचा वडवणी पोलिसांना आंदोलनकर्त्यांनी अल्टिमेट दिला आहे.

### इस्माईल पठाण सह ६० ते ७० जणावर गुन्हे

याप्रकरणी अनिल धोंडीराम म्हेत्रे यांच्या फिर्यादीवरून इस्माईल पठाण नन्नु जावेद, महेबुब सय्यद,फारुक रौफ,कलाम सय्यद,वजीद कुरेशी, अशकान कुरेशी, मुन्ना हरून शेख, जनुदे शेख, जुसेर शेख, तोफिक रफिक कुरेशी, यांच्यासह ६० ते ७० जणावर गुन्हा रजिस्टर नंबर १७३/२०२६ कलम १०९(१), ३५३(२), १८९,१९०,१९१,१९२ भा.न्या.स कलमनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत तर गणेश टिपरे या तरुणाला सत्तुरणे मारहाण केली आहे.

# बिंदुसरा बंधाऱ्यामुळे बीडचा 'ड्राय झोन' होणार पाणीदार

## भूजल पातळी वाढवण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर ॲक्शन मोडमध्ये; बार्शी नाका येथील पूल कम बंधार्याच्या कामाची पाहणी करून, काम ऑक्टोबरच्या अगोदर करण्याच्या दिल्या सूचना

बीड । प्रतिनिधी

शहराला होणारा विलंबाचा पाणीपुरवठा आणि पावसाची ओढ यामुळे माजलगाव धरणात सध्या अवघा २२ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. या पार्श्वभूमीवर येत्या काळात बीड शहराला भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. परतीचा पाऊस झाल्यास ते पाणी नदीमार्गे वाहून जाऊ नये, यासाठी आमदार संदीप क्षीरसागर सतर्क झाले आहेत. शहरातील बार्शी नाका येथे सुरू असलेल्या पूल कम बंधार्याच्या कामाला गती देऊन ऑक्टोबर मध्ये परतीच्या पावसात पाणी



अडलेच पाहीजे, अशा हिशोबाने कामाची गती वाढविण्याच्या सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी संबंधितांना दिल्या आहेत.

शनिवारी (दि. २२) रोजी आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम यांनी बिंदुसरा नदीवर सुरू असलेल्या 'पूलकम बंधारा' कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. या पूल कम बंधार्याच्या माध्यमातून बीड शहरातील ५ कि.मी.च्या परिघात भूजल पातळीत मोठी वाढ होणार असल्याने आ.क्षीरसागर यांनी कंत्राटदार आणि संबंधित अभियंत्यांना पान २ वर

# कमरेला गावठी कट्टा लावून हॉटेलमध्ये जेवणाऱ्या तरुणाला बेड्या; एलसीबीची धडक कारवाई

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कमरेला गावठी कट्टा (पिस्तूल) लावून हॉटेलमध्ये जेवणाऱ्या एका तरुणाला बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या (ङउइ) पथकाने सापळा रचून रंगेहात पकडले. त्याच्याकडून एक गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे असा सुमारे ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशानुसार अंबाजोगाई उपविभागात अवैध धंद्यांवर कारवाईसाठी पथक गस्त घालत होते. दरम्यान, अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परळी रोड, शेपवाडी येथील हॉटेल लक्ष्मीनारायणमध्ये एक तरुण कमरेला गावठी पिस्तूल लावून जेवण करत बसल्याची गुप्त माहिती पथकाला मिळाली.

माहितीची खात्री पटल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या



मार्गदर्शनाखाली पान २ वर

# खांडेपारगाव शिवारात एलसीबीची धडक कारवाई; साडेआठ लाखांचा गुटखा व इनोव्हा जप्त

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात अवैध धंद्यांवर कारवाईची मोहीम सुरू असतानाच, बीड स्थानिक गुन्हे शाखेने (ङउइ) एका मोठ्या गुटखा तस्करीचा पर्दाफाश केला आहे. पिंपळनेर ते बीड रस्त्याने इनोव्हा कारमधून होणारी गुटख्याची अवैध वाहतूक पकडून पोलिसांनी तब्बल ८ लाख ५५ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई मौजे



खांडेपारगाव शिवारातील उमरी ते खांडेपारगाव जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी पेट्रोलिंग करत असताना, एका पांढऱ्या रंगाच्या इनोव्हा कारमधून गुटखा भरून बीडकडे आणला जात असल्याची खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पान २ वर

# पाटोदा कॉलेजच्या कार्यक्रम पत्रिकेवरून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत गटबाजी चव्हाट्यावर; पालकमंत्री सुनित्राताई पवार आणि बाळासाहेब आजबे यांची नावे वगळल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी!

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा येथील कॉलेजच्या एका आगामी कार्यक्रमाची पत्रिका सध्या सोशल मीडियावर जोरदार चर्चेचा विषय ठरली आहे. विशेष म्हणजे, या कार्यक्रम पत्रिकेमध्ये बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनित्राताई पवार आणि माजी आमदार बाळासाहेब आजबे यांचे नाव व फोटो दोन्ही नसल्याचे समोर आले आहे. यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

एकाच पक्षातील प्रमुख नेत्यांच्या नावांमध्ये आणि छायाचित्रांमध्ये अशा प्रकारे दुर्लक्ष किंवा दुजाभाव का केला जात आहे? यामागचे नेमके कारण काय? असे सवाल उपस्थित करत राजकीय वर्तुळात आता उलट-सुलट चर्चांना उधाण आले आहे.

गटबाजीच्या चर्चेला उधाण

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील (अजित पवार गट) अंतर्गत गटबाजीची चर्चा पुन्हा एकदा या निमित्ताने तीव्र झाली आहे. स्थानिक पातळीवर नेत्यांमध्ये समन्वय नसल्याची आणि यादवी वाढल्याची कुजबूज राजकीय वर्तुळात सुरू असून, या प्रकारामुळे कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांचेच नाव अधिकृत पत्रिकेत नसल्यामुळे प्रशासकीय व राजकीय स्तरावर विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत.

पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्या अनुपस्थितीचीही चर्चा

याच कार्यक्रमाच्या अनुषंगाने, भाजप नेत्या पंकजा मुंडे आणि मंत्री धनंजय मुंडे यांनी या कार्यक्रमाकडे पाठ फिरवल्याची चर्चा देखील पाटोदा तालुक्यात रंगली आहे. स्थानिक राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर दिग्गज नेत्यांची अनुपस्थिती आणि राष्ट्रवादीच्या स्थानिक पातळीवरील पत्रिकेतील नावांचा वाद यामुळे हा कार्यक्रम सध्या संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचे केंद्रबिंदू ठरला आहे. या राजकीय घडामोडींवर आगामी काळात स्थानिक नेते आणि पक्षश्रेष्ठी काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# समाजरत्न पुरस्काराने पत्रकार नवनाथ कांबळे सन्मानित



दिंद्रुड । प्रतिनिधी

सामाजिक कार्यात अग्रेसर राहुन, समाज कार्यात हिरीरीने भाग घेत समाजसेवा करणारे दिंद्रुड येथील पत्रकार तथा डिपीआयचे बीड जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे यांना साहित्यरत्न, लोकशाहीर डॉ.अणाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त समाजसेवा संघर्ष यौध्दा पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.तेलगाव येथे शनिवारी मान्यवरांच्या उपस्थितीत नवनाथ कांबळे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीच्या औचित्याने तेलगाव, कारी येथे एका भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन शनिवार दि.२२ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ.प्रकाश दादा सोळंके होते तर प्रमुख उपस्थितीत क्रांतीसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिनभाऊ साठे, माजी सभापती जयसिंह भैया सोळंके, जेएनयुचे प्रा.मिलिंद आवाड आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या निमित्त समाजातील जे कर्तृत्ववान व समाजासाठी स्वत:झोकुन दिलेले दिंद्रुड येथील पत्रकार तथा डिपीआयचे बीड जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे यांना आज पर्यंत समाजाप्रती पान २ वर

# पाच गावांतील १३ शेतकऱ्यांचा ऊसासाठी ए.आय. तंत्रज्ञानाचा वापर

## तेलगाव खुर्द आणि गंगामसला येथे ए.आय तंत्रज्ञानयुक्त ऊस प्लॉटची पाहणी

माजलगाव । प्रतिनिधी

व्हीएसआय (VSI), पुणे, कृषी विज्ञान केंद्र (केव्हीके), बारामती आणि एन एस एल शुगर लि. युनिट-३ जय महेश साखर कारखान्याच्या संयुक्त सहकार्यातून १३ शेतकऱ्यांनी महत्त्वाकांक्षी ए.आय आधारित ऊस तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला आहे. या शेतकऱ्यांनी डिसेंबर अखेरीस ते जानेवारी महिन्यात जय महेश कारखान्याने उपलब्ध करून दिलेल्या ऊस रोपांची



लागवड केली आहे.

एन एस एल शुगर, जय महेश या साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील तालखेड,तेलगाव खुर्द,एकदरा, गंगामसला, मोठेवाडी या पाच गावांतील १३ शेतकरी ए.आय तंत्रज्ञानाचा वापर करीत आहेत. ऊस उत्पादनात दीडपट ते दुप्पट वाढ करून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या उद्देशाने कारखान्याकडून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कारखान्याचे जनरल मॅनेजर पारसनाथ जयस्वाल,असिस्टंट जनरल मॅनेजर दत्तात्रय आहेरकर व सर्व शेतकी विभागाने ए.आय आधारित ऊस तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १३ शेतकऱ्यांची निवड करून हा उपक्रम राबविण्यात आला.

सहभागी गावांतील शेती प्लॉटच मॅपिंग करून दोन हवामान केंद्रांवर आधारित क्लस्टर तयार करण्यात पान २ वर

# मुख्यमंत्री सहायता निधीतून आणखी चार रुग्णांना मदतीचा आधार

## आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून ३ लाख ६० हजार रुपयांची मदत मंजूर; आष्टीसह बाहेरील जिल्ह्यातील रुग्णांनाही मदतीचा हात

आष्टी (प्रतिनिधी) : गरजू रुग्णांना आर्थिक अडचणींमुळे उपचारापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहायता निधीतून सातत्याने मदत मिळवून दिली जात आहे. याच पाठपुराव्यातून आता चार रुग्णांच्या वैद्यकीय उपचारांसाठी एकूण ३ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे.

यामध्ये शितल राजू म्हसके रा. कोरेगाव चिखली (वाळकी), जि. अहिल्यानगर यांच्या उपचारांसाठी ८० हजार रुपये, तर प्रकाश थोरे रा. तिंतरवणी, ता. शिरूर कासार यांच्या उपचारांसाठी ८० हजार रुपये मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर झाले आहेत.

तसेच शंकर कुसळकर रा. कडा, ता. आष्टी यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी ५० हजार रुपये, तर पंकज बोडखे रा. आनंदवाडी, ता. आष्टी यांच्या उपचारांसाठीही मुख्यमंत्री सहायता निधीतून ५० हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

कागदपत्रातील अडचणही झाली दूर

प्रकाश थोरे यांच्या मदतीच्या प्रस्तावासमोर कागदपत्रांची अडचण निर्माण झाली होती. आधारकार्डवर आडनाव 'थोरे', तर रेशनकार्डवर 'थोरवे' अशी नोंद असल्याने प्रस्तावाच्या प्रक्रियेत



अडथळा आला होता. मात्र संबंधित प्रकरण तहसील कार्यालयाकडे पाठवून अधिकाऱ्यांशी संपर्क साधत आवश्यक पाठपुरावा करण्यात आला आणि ही अडचण दूर करून त्यांना ८० हजार रुपयांची मदत मंजूर करून घेण्यात यश आले.

मतदारसंघाच्या पलीकडेही मदतीचा हात

आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून केवळ आष्टी विधानसभा मतदारसंघातीलच नव्हे, तर बाहेरील जिल्ह्यातील गरजू रुग्णांनाही मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळत आहे. शितल राजू म्हसके हे अहिल्यानगर जिल्ह्यातील असल्याने त्यांच्या उपचारांसाठीही मदतीचा पाठपुरावा करण्यात आला. रुग्ण कोणत्या गावाचा किंवा कोणत्या जिल्ह्यातील आहे, यापेक्षा त्याला उपचारासाठी आर्थिक मदतीची गरज आहे का, याला प्राधान्य देत मदतीसाठी प्रयत्न केले जात असल्याचे या माध्यमातून दिसून येत आहे.

यापूर्वीही अनेक रुग्णांना मदत

यापूर्वीही आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सहायता निधीतून अनेक गरजू रुग्णांना मदत मिळवून देण्यात आली आहे. अलीकडेच जनाबाई पांडुळे यांना ८० हजार, ज्ञानदेव गणगे यांना ५० हजार आणि अशोक जायभाय यांना ४० हजार रुपये, अशी एकूण १ लाख ७० हजार रुपयांची मदत मंजूर झाली होती. त्यानंतर आता या चार रुग्णांसाठी ३ लाख ६० हजार रुपयांची मदत मंजूर झाली आहे.

वैद्यकीय उपचारांचा वाढता खर्च सर्वसामान्य कुटुंबांसाठी मोठे आर्थिक संकट ठरत असताना मुख्यमंत्री सहायता निधीतून मिळणारी मदत रुग्णांच्या कुटुंबीयांसाठी मोठा आधार ठरत आहे. गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून सुरू असलेला पाठपुरावा सातत्याने सुरू आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26